म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सग्रहालय क्रमांक
लेखक
पुस्तकाचें नांव
सन
म. ग्रं. सं.
विषय
सं. नं.

# स्वधर्मप्रकाश

अथवा

## एका महान् साधूची अद्भुत देणगी.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥

लोकहितार्थ

**रघुनाथ गणेश नावलेकर बी. ए.**

हा. स्कू. सागर यांनीं

मुंबईत,

**जावजी दादाजी यांच्या**

"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

सन १८९३ इसवी.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.

# उपोद्घात.

या लहानशा पुस्तकांत धर्माचरणापासून झालेले लाभ व अधर्माचरणापासून झालेले तोटे यांचा विचार वेदशास्त्राधारानें झालेल्या स्वानुभवावरून केला आहे. देशसुधारणेची पहिली पायरी व्यक्तिसुधारणा होय. व्यक्तिसुधारणा नुसत्या इंग्रजी भाषेंत पारंगत झाल्यानें होत नाहीं, किंबहुना या विद्येच्या ज्ञानानें व्यक्तीच नासते; तेव्हां अशा प्रकारें विघडलेल्या व्यक्तीपासून देशाची कितपत सुधारणा होणार हें सांगणेंच नको. ज्या वर्णांत जो उत्पन्न झाला असेल त्यानें त्या वर्णाच्या धर्मानें दाखविलेल्या मार्गानें वागून स्वतःचें आचरण सुधारलें पाहिजे. नंतर कुटुंब, समाज व देशाच्या सुधारणेचा विचार. या महत्वाच्या गोष्टींवर सुधारक ह्मणविणाऱ्या आधुनिक विद्वानांचें अगदीं दुर्लक्ष्य असल्यामुळें सुधारणेच्या चालू असलेल्या खटपटीपासून ते स्वतःस बरोबर घेऊन साऱ्या भरतखंडाचा विध्वंस करून राहिले आहेत.– धर्म तत्वांस अनुसरून या देशाची सर्व रचना झालेली आहे. सबब जों धर्माचें संरक्षण होणार नाहीं तों दिवसेंदिवस या देशाची अधिकाधिक दुर्दशा होणार यांत बिलकुल शंका नाहीं.

या पुस्तकांतील विषय वाचकांस कंटाळवाणा न वाटावा एतदर्थ विषयाचे विभाग केले आहेत. एक भाग दुसऱ्यापासून अगदीं निराळा आहे असें मात्र समजूं नये.

धर्मतत्वांचे सिद्धांत जगमान्य ग्रंथांत आहेतच. त्या सिद्धांतांचा व्यक्तीपासून देशापावेतों कोणत्या प्रकारचा संबंध आहे तो मात्र स्वानुभवानुसार संक्षेपतः येथें प्रदर्शित केला आहे. तदनुसार विचार केल्यास वेदशास्त्रविहित प्रत्येक गोष्टीचा उद्देश लक्षांत येऊं शकेल. ही सर्व रचना काल्पनिक आहे असेंही कोणी मानल्यास हरकत नाहीं, कारण कल्पनेस जो आधारभूत पदार्थ असेल तो खराच ठरणार. रज्जूवर सर्पाची कल्पना होते. सर्प काल्पनिक ठरल्यावर रज्जू सत्य ठरणारच. तरी रचना काल्पनिक आहे. इतकें जरी कोणी मानून ही कल्पना ज्या सत्यपदार्थावर असेल तो शुंडून काढण्याकडेस लोक प्रवृत्त होतील अशी आशा आहे.

सदानंदमहाराज कोण व कोठें राहतात याचा निर्णय प्रथमाध्यायांत चांगल्या प्रकारें केला आहे. त्यावर खोल विचार करून वाचकांनीं त्यांचे राहण्याचें स्थान ओळखून काढावें. ज्यास त्यांच्या निवासस्थानाची ओळख होईल तोच खरा विद्वान व खरा सुखी होणार आहे. कोणताही पदार्थ अमुक ठिकाणीं आहे हें विदित झालें ह्मणजे तो योग्य साधनानें व सुलभतेनें प्राप्त करून घेतां येतो. साखर गोड आहे इतकें मात्र ज्ञान दुसरा करूं शकेल. तिची गोडी कळण्याकरितां त्या ज्ञानावर विश्वास ठेवून साखर जिभेवर ठेविलीच पाहिजे, दुसरा मार्गच नाहीं. या सत्पुरुषाची देदीप्यमान कांति, सौंदर्य व ज्ञान यांची बरोबरी करणारा दुसरा सांपडेल याची आशा नाहीं. अशा सत्पुरुषाची भेट घेण्याची इच्छा असल्यास प्रथम स्वधर्मानुसार स्वतःची सुधारणा या पुस्तकांत दाखविलेल्या मार्गानें केली पाहिजे. डिपुटी कमिशनर वगैरे अधिकाऱ्यांची देखील भेट त्यांच्या मर्जीविरुद्ध होऊं शकत नाहीं. तेव्हां निस्पृह व विरक्त असलेल्या सत्पुरुषाची भेट त्यानें दाखविलेल्या मार्गाचा अवलंब धरणारासच होणें शक्य आहे, यांत कांहीं नवल नाहीं. ज्यांस हा पुरुष काल्पनिक आहे असें वाटेल त्यांस त्यांचें निवासस्थान देखील कळणार नाहीं तेव्हां भेट होणें तर लांब आहे.

पुस्तक जून महिन्याच्या अखेर पावेतों छापून तयार होईल असा अजमास होता, परंतु कांचणीमुळें विलंब झाला याची वर्गणीदारांनीं क्षमा करावी. पांच चार वर्गणीदारांखेरीज कोण

गणी आली नाहीं हें उत्तम झालें, नाहीं तर प्रसिद्धकर्ता मोठ्या अपवादास पात्र होता.–भाषासंबंधानें मोठीच अडचण होती. ही अडचण रा० नारायणराव झोलवा खांडवेकर या गृहस्थांनीं बहुतांशीं दूर केली. विषयाचे विभाग यांच्याच सूचनेवरून करण्यांत आले. भाषेच्या अतोनात चुका असल्यामुळें यांस मोठे परिश्रम करून बराच काळ या कामीं लावणें पडला. या सत्कार्यांत केलेल्या परिश्रमांचें फळ अचिंत्य रीतीनें परमात्म्याकडून त्यास मिळेल. प्रसिद्धकर्ता, रा० नारायणरावजींचा फार फार आभारी आहे.

वाचकांस अखेर प्रार्थना ही आहे कीं त्यांनीं भाषेच्या नोकझोंकीवर लक्ष्य न देतां वेड्यावांकड्या भाषेंत गुंडाळलेल्या विचारांवर मात्र तात्पर्य ठेवावें. मराठी भाषेचा बाणा मिरविणारे विद्वान देखील या भाषासंबंधानें टीकेस पात्र होतात तेव्हां मराठी भाषेंत अनभिज्ञ असल्यामुळें यांत टीकेस पदोपदीं स्थळ मिळण्यासारखें आहे. ज्या ठिकाणीं दोष फार असतात त्या ठिकाणीं गुण काय आहे यावर मात्र लक्ष्य ठेवण्याचा प्रघात आहे. याच प्रकारची कृपादृष्टि सर्व वाचकजन, वर्तमानपत्रकर्त्ते, मासिकपुस्तककर्त्ते या महान् साधूच्या अद्भुत देणगीवर करतील अशी आशा आहे.

सागर.<br>२७।६।९३.

र० ग० नावलेकर.

## विषयानुक्रम.


| भाग. | पृष्ठ. |
|---|---|
| १ धर्म ह्मणजे काय. | १ |
| २ धर्माचरण का अवश्य. | ४ |
| ३ धर्माचरणापासून उत्पन्न झालेली सामाजिक स्थिति. | ८ |
| ४ धर्माचरण क्षीण झाल्याचे परिणाम. | ११ |
| ५ पुनर्जन्म व प्रारब्ध. | २१ |
| ६ बालविवाह स्त्रीशिक्षण वगैरे. | २३ |
| ७ ब्राह्मणज्ञातीची सांप्रतस्थिति. | २५ |

# स्वधर्मप्रकाश.

## भाग १ ला.

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ १ ॥**

धर्म ह्मणजे काय व त्याचें योग्य परिपालन व्यक्तिमात्रांस अवश्य कां याचा प्रथम विचार करूं. सत्य काय व असत्य काय याचा निर्णय करून सत्याचें ग्रहण करणें व असत्याचा त्याग करणें यास धर्म असें ह्मणतात. हा सत्यासत्याचा निर्णय वेदांनीं केला आहे. वेद ह्मणजे सांप्रत जीं वेदांचीं पुस्तकें उपलब्ध आहेत तींच वेद नव्हत, तर त्या पुस्तकांत असलेल्या ज्ञानानें ज्या सच्चिदानंद परमेश्वराचा बोध होतो त्यास वेद ह्मणतात. जेव्हां सत्, चित् व आनंद हे तीन गुण लीन होते, तेव्हां त्या परमेश्वरास कोणतीही संज्ञा नव्हती. शुद्धांतःकरण झालेल्या महात्म्यास एकाग्रतेच्या स्थितींत ज्या परमात्म्याच्या स्फूर्तीचा बोध झाला, त्या परमात्म्याच्या स्फूर्तीला वेदवाणी ही संज्ञा मिळाली. व ज्या पुस्तकांत सांप्रत ही वाणी वाचण्यास मिळते, तीस वेद संज्ञा मिळाली. वाणी अदृश्य पदार्थांपैकीं एक मुख्य पदार्थ आहे. कारण, वाणीच्या द्वाराच पदार्थाचें ज्ञान होतें. प्रत्येक पदार्थाच्या व्यक्त, अव्यक्त अशा दोन अवस्था आहेत. अव्यक्तदशेंत जोंपर्यंत पदार्थ स्थित असतो, तोंपर्यंत त्या पदार्थास नांवरूप कांहींएक नसतें. व्यक्त होतांच त्यास नांवरूप मिळतें. कोणतेंही बीज उघडून पाहिलें असतां त्यापासून उत्पन्न होणारा वृक्ष त्याच्या आंत अतिसूक्ष्म दशेंत स्थित असलेला सांपडतो; तरी ज्या काळीं तें बीज जमिनींत पडून त्यापासून उत्पन्न झालेला वृक्ष प्रत्यक्ष दिसूं लागतो, तेव्हांच त्याला वृक्ष संज्ञा दिली जाते. तस्मात् पूर्वी अव्यक्तदशेंत असतांना त्यास नाम, रूप कांहींएक नव्हतें; व्यक्त होतांच वृक्ष हें नांव मिळालें. हा नियम प्रत्येक प्रत्ययास येणाऱ्या स्थूल किंवा सूक्ष्म दृश्य किंवा अदृश्य पदार्थास लागू आहे; असें अनुभवसिद्ध आहे. आह्मी जें बोलतों त्यास शब्द किंवा वाणी संज्ञा देतों. ते शब्द किंवा ती वाणी बोलण्याच्या पूर्वी सूक्ष्मदशेंत असते किंवा नाहीं याचा अनुभव प्रत्येकास होण्यासारखा आहे. कोणी मनुष्य मजपाशीं येऊन एकदम बोलला, "मला कांहीं अर्ज करणें आहे." या एकत्र असलेल्या शब्दांस मीं भाषण संज्ञा दिली. त्यास या भाषणाची रचना कोणत्या प्रकारची आहे ती पाहूं—यांत पांच शब्द आहेत व प्रत्येक शब्दांत दोन किंवा तीन अक्षरें आहेत. अक्षराचे दोन भेद, स्वर आणि व्यंजन. स्वराचें उच्चारण स्वतः होतें, परंतु व्यंजनाचें उच्चारण किंवा स्थिति स्वराच्या संयोगावांचून होऊं शकत नाहीं; ह्मणजे व्यंजन अक्षरास अक्षर संज्ञा तेव्हांच होते कीं, जेव्हां त्याचा प्रथम स्वराशीं संयोग होतो. यावरून हें उघड आहे कीं वरच्या संभाषणांत स्वर, व्यंजन, शब्द व वाक्यरचना त्या मनुष्याच्या मनांत सूक्ष्मदशेंत स्थित होती ह्मणूनच तो त्या वेळेस हें वाक्य बोलूं शकला. अक्षराच्या द्वारें पदार्थाचा बोध होतो आणि बोध झाल्यानंतर अमुक पदार्थ आहे असें ह्मणतां येतें. अक्षर ह्मणजे ज्यास क्षर अर्थात् नाश नाहीं; असा पदार्थ सच्चिदानंद परमात्म्यावांचून कोणताच नाहीं. तस्मात् जग व जगांतील सर्व पदार्थ परमात्म्यापासूनच उत्पन्न होतात व ज्या अर्थी वर्णमालेचीं अक्षरें जगांत आहेत त्या अर्थी तींही त्याच परमात्म्यापासून उत्पन्न होऊन पदार्थसंज्ञा देण्यास उपयोगीं पडतात.

यावरून हें स्पष्ट कळण्यासारखें आहे कीं, सूक्ष्म किंवा अव्यक्त स्थितीपासूनच प्रत्येक दृश्य किंवा अदृश्य पदार्थ

व्यक्तदशेस येतो, व व्यक्त होतांच त्यास नाम, रूप प्राप्त होतें. पदार्थाच्या अव्यक्तदशेसच प्रकृति संज्ञा आहे. आह्मी ह्मणतों गोपाळाचा स्वभाव चांगला किंवा वाईट आहे. स्वभाव अदृश्य असतांही आह्मास त्याची ओळख कोणत्या प्रकारानें झाली किंवा होते ? तो दिसूं शकत नाहीं, ऐकूं येत नाहीं, त्याचा गंध येत नाहीं, किंवहुना त्याची ओळख कोणत्याही इंद्रियद्वारा होऊं शकत नाहीं. तथापि स्वभाव चांगला किंवा वाईट असें आह्मी ह्मणतों. हें कोणत्या आधारावरून ? त्याच्या वर्तनद्वारा घडून आलेल्या चांगल्या किंवा वाईट परिणामावरून आह्मास दुसऱ्याच्या स्वभावाची ओळख होते; किंवहुना आह्मास स्वतांच्या स्वभावाचीही ओळख त्यापासून घडून आलेल्या परिणामावरूनच होते, परंतु तो स्वभाव त्या परिणामापूर्वी अव्यक्तदशेंत होता. या न्यायानें पाहिलें असतां ज्यास वेद ह्मणतात, तो परमेश्वर व त्याच्या प्रकृतीची स्फूर्ति वर सांगितलेल्या सत्पुरुपास श्रुत झाली. ती अव्यक्तदशेंत त्याच परमेश्वराची प्रकृति किंवा शक्ति असून स्फूर्तिरूपानें व्यक्त होतांच तीस वेदवाणी ही संज्ञा प्राप्त झाली. ह्मणजे वेद जो परमेश्वर त्याची वाणी, व या वाणीसही वेद ह्मणूं लागले; कारण ज्या पदार्थाची उत्पत्ति ज्यापासून होते त्यांतच त्याची स्थिति व लय असतात. उदाहरणार्थ—सोन्यापासून सोन्याचीं आभूषणें तयार होतात. त्या आभूषणांस गाळतांच पूर्ववत् सोनेंच कायम राहतें. आभूषणांची स्थितिही सोन्यांतच आहे. कारण सोनें आहे तरच सोन्याचीं आभूषणेंही आहेत. व सोन्यांतच त्या आभूषणांची गणना केली जाईल. इतर कोणत्याही धातूंत त्याची गणना होणार नाहीं. तस्मात् आभूषणांचें खरें रूप सोनेंच ह्मटलें जाईल. तद्वतच वेदवाणी ज्या परमेश्वरापासून उत्पन्न झाली, तो परमेश्वरच त्या वेदवाणीचें वास्तविक रूप आहे; व ज्या अर्थी परमेश्वरावांचून वेदवाणीची स्थिति होऊं शकत नाहीं त्या अर्थी त्या वेदवाणीचें वास्तविक रूप वेद जो सच्चिदानंद परमेश्वर तोच आहे. जसें सोनें व त्यापासून केलेलीं आभूषणें हीं दोन पदार्थ नाहींत तद्वतच वेद व वेदवाणी हीं दोन पदार्थ होऊं शकत नाहींत. आभूषणांचें नांव, रूप जसें सोन्याच्या गोळ्यांत पूर्वी अव्यक्त होतें व व्यक्त होतांच आभूषणसंज्ञा झाली तद्वतच परमेश्वराची प्रकृति ज्या काळीं लीन होती, ह्मणजे सच्चिदानंदात्मक होती त्या काळीं तीस कोणतीही संज्ञा नव्हती. स्फूर्तिरूपानें व्यक्त होतांच वाणी संज्ञा पावली. तस्मात् वेद व वेदवाणींतही अभिन्नता असल्यामुळें त्या वाणीसही तिचें वास्तविक रूप जो वेद तेंच नांव प्राप्त झालें. वेद किंवा परमेश्वर अनंत, अगाध व सनातन आहे तेव्हां वेदवाणीही अनंत, अगाध व सनातन आहे. व ज्याप्रकारें शब्द ऐकून शब्दांतील आशय लक्षांत येतो तद्वतच वेदवाणीच्या द्वारें त्यांत वर्णन केलेल्या सच्चिदानंदरूप परमात्म्याची लक्षणा करतां येते. स्फूर्ति होण्यापूर्वी प्रकृतीस प्रकृतिसंज्ञा किंवा सच्चिदानंद ब्रह्मास परमेश्वर अथवा वेद ह्या संज्ञा नव्हत्या. त्या काळीं सत्, चित् आणि आनंद या व्यतिरिक्त कांहींएक नव्हतें; या अवस्थेसच ब्रह्मावस्था ह्मणतात. ब्रह्म सदोदित निर्विकार राहतें. त्याची शक्ति किंवा प्रकृति विकारास प्राप्त होते. विकार उत्पन्न होतांच त्याच पूर्वी लीन असलेल्या सच्चिदानंदात्मक प्रकृतीस सामान्य नाम प्रकृति व विशेष नाम वाणी अशा संज्ञा होतात. तेव्हां वाणीचेंही वास्तविक रूप सच्चिदानंदात्मकच आहे. सच्चिदानंद ब्रह्म आहे ह्मणून ब्रह्म सामान्य व विशेष कार्यात अनुस्यूतच असलें पाहिजे. जसें सोन्याचें सुवर्णत्व आभूषणांत अनुस्यूत राहतें व सुवर्णव्यतिरिक्त सुवर्णाच्या आभूषणांची स्थितिही मिळणार नाहीं, तद्वत् ब्रह्मांतच प्रकृति किंवा प्रकृतीच्या स्फूर्ति ह्मणजे वाणीची स्थिति आहे. आभूषणास आधारभूत असलेल्या सुवर्णास, गोट, पाटल्या, ह्या संज्ञा होतात; तद्वतच वेदवाणीस आधारभूत जें ब्रह्म त्यास ईश्वर संज्ञा होते, तस्मात् वेदवाणी सच्चिदानंद परब्रह्मासच बोध करविणारी आहे.

सूर्याचा प्रकाश सूर्यावांचून वेगळा होऊं शकत नाहीं किंवा अग्नीचें दाहकत्व अग्नीहून निराळें राहूं शकत नाहीं, परंतु प्रकाशापासून व दाहकत्वापासून झालेलीं कार्यें ह्मणजे शोपण व दहन उक्त शक्ति निघून गेल्यावरही सांपडतात. निर्दिष्ट शक्ति जोंपर्यंत आपल्या अधिष्ठानावर असते तोंपर्यंतच कार्य उत्पन्न

करूं शकते, आणि ज्याअर्थी अधिष्ठान सोडून शक्ति निराळी राहूंच शकत नाहीं त्याअर्थी सच्चिदानंदात्मक मूळप्रकृति आपलें सच्चिदानंदात्मक स्वरूप जसेंचेंतसेंच कायम राखून चित्रविचित्र जग उत्पन्न करिते व अधिष्ठान सच्चिदानंदात्मक मूळस्वरूपानें या जगास प्रकाशित करते.

परमेश्वराच्या शक्तीस व्यक्तदशेंत जग किंवा माया ह्मणतात व अव्यक्तदशेंत त्याच शक्तीस प्रकृति संज्ञा आहे. प्रकृति परमेश्वरावांचून राहूं शकत नाहीं हें वर सांगितलें आहे; ह्मणून जगही परमेश्वरापासून वेगळें नाहीं. परमेश्वर सर्व जगास आधार असून अणूपासून आब्रह्म जीं शक्तीचीं कार्यें त्या सर्वांत व्याप्त आहे. ज्याअर्थी परमेश्वराची सर्वव्यापकता निर्विवाद आहे त्याअर्थी प्रत्येक जड, अजड, स्थूल, सूक्ष्म, दृश्य, अदृश्य पदार्थांत परमेश्वराचा अंश असलाच पाहिजे व हा अंश प्रत्येक पदार्थांत असलेल्या अस्तित्वानें पदोपदीं प्रकाशित असतांही मायेनें भ्रमांत घातल्यामुळें ज्या अस्तित्वाच्या बळानें पदार्थांचा बोध होतो त्याच अस्तित्वाचा दुर्बोध होतो व नामरूपात्मक पदार्थच खरा वाटूं लागतो. परमेश्वर सर्वव्यापक आहे व ज्याअर्थी पाषाणादि० सर्व जड वस्तूंत अंशभूत आहे त्याअर्थी मानवदेहांतही अंशभूत आहे असें मनुष्यास ज्ञान होणें योग्य आहे. कारण कीं—

**ब्रह्मणः सर्वभूतानि जायन्ते परमात्मनः ॥**
**ब्रह्मैव सर्वनामानि रूपाणि विविधानि च ॥**
**कर्माण्यपि समग्राणि विभर्तीति श्रुतिर्जगौ ॥** आचार्य.

आकाशापासून देहापर्यंत पदार्थांची उत्पत्ति, स्थिति व लय त्यांचें गुण व त्यांच्या क्रिया परमेश्वरांशावरच आहेत असें श्रुतिप्रमाण आहे; व त्याच्या अंशाच्या बळावर मनुष्य नानाप्रकारचीं विषयसुखें भोगण्यास समर्थ होतो. या विषयसुखांत मनुष्य इतका मग्न होऊन जातो कीं त्या ईश्वरांशास अगदींच विसरतो व स्वेच्छाचारी बनून बहुमोल नरदेहतनूचा अपव्यय करितो. ज्याच्या बलावर तो खाणेंपिणें इत्यादि व्यवहार करण्यास समर्थ होतो त्या बलाचा यत्किंचित्‌ही ऋणी न होतां जो जो व्यवहार होतो तो करणारा मीच व माझ्याच बलानें हें सर्व झालें असा मदोन्मत्त होऊन वरळत सुटतो. केवढी ही कृतघ्नता व केवढा उन्माद !!!

कोणत्याही पदार्थाचें नास्तित्व त्या पदार्थाच्या अस्तित्वाचें भान असल्यावांचून ह्मणतांच येत नाहीं, ह्मणजे पदार्थाचा बोध असल्यावांचून तो पदार्थ नाहीं असें कोणासही ह्मणतां येणार नाहीं. अभ्रानें आच्छादित झालेला सूर्य दिसत नाहीं खरा, परंतु तो का नाहींसा झाला? त्याचा प्रकाश पूर्ववत् राहतो व अभ्ररूपी प्रतिबंधास छेदून तो आह्मांस मिळतो. या प्रकाशाचा बोध होत असतांही सूर्य दिसत नाहीं असें अज्ञ ह्मणतात. ज्याच्या प्रकाशाच्या बलावर सूर्य नाहीं असें ह्मणण्यास समर्थ होतात त्याचेंच अस्तित्व नाकबूल करितात. सूर्य दिसत नाहीं असें रात्रीं कोणी ह्मणेल काय? तस्मात् पदार्थाचें अस्तित्व जाणल्यावांचून पदार्थ नाहीं ह्मणतांच येत नाहीं; हा विपरीत बोध अज्ञानामुळें होतो. जसजसें अज्ञान नाहींसें होत जातें तसतसा पदार्थाच्या अस्तित्वाचा बोध होऊं लागतो. तद्वतच ईश्वर नाहीं ह्मणणारे लोक त्याचे अस्तित्वाचा बोध घेत असतांही नास्तिक्यभाव प्रगट करतात. याचें कारण हेंच कीं अज्ञानरूपी अभ्रानें त्यांच्या ज्ञानशक्तीस आच्छादित केलें आहे. अभ्रानें आच्छादित सूर्य दिसत नसल्यामुळें मुलांनीं सूर्य नाहीं असें ह्मटलें तरी तो पूर्ववत् प्रकाशमान असतो. तसेंच नास्तिक लोकांच्या नाहीं ह्मणण्यानें ईश्वराचें अस्तित्व नाहींसें होत नाहीं. ईश्वराचें अस्तित्व न मानल्यानें ते आपलेंच अस्तित्व मानीत नाहींत असें होतें. ह्मणजे जीवंत असून मृत आहों असें भासविण्यासारखें चमत्कारिक आहे. या योगें नास्तिकांस अन्य जन्मीं वा प्रत्यक्ष या जन्मीं निःसंशय प्रायश्चित्त भोगणें भाग पडणार आहे, किंबहुना प्रायश्चित्त देखील भोगीत आहेत.

हा जो ईश्वरी अंश मनुष्याच्या शरीरांत आहे, तोच अंश धर्मज्ञान स्वरूप आहे. याच्याच प्रेरणेनें धर्माधर्माचा बोध मनुष्यास होतो. जोंपर्यंत चित्त दुराचरणानें कलुषित झालेलें नसतें तोंपर्यंत ही प्रेरणा होते, जसजसा चित्तावर मळ चढत जातो तसतसा या प्रेरणेचा बोध कमी कमी होत जातो. लहान मुलाच्या आचरणावरून या गोष्टीची सत्यता अगदीं स्पष्ट दिसते. कांहींएक त्यास चोरून खाणें झाल्यास तो कोणी नसेल त्या जागीं जाऊन खातो. चोरून खाणें वाईट हें ज्ञान त्यास ईश्वरांशप्रेरणेनें होतें. नाहीं तर तो कधीं छपून खाताना. हा धर्मज्ञानस्वरूप ईश्वरांश बाल्यावस्थेपासून तारुण्यावस्थेपर्यंत सारखा राहतो.

**बाल्यादिष्वपि जाग्रदादिषु तथा सर्वास्ववस्थास्वपि**
**व्यावृत्तास्वनुवर्तमानमहमित्यंतःस्फुरंतं सदा ॥** आचार्य.

सूर्याची स्थिति आकाशमंडलांत आहे. तो कांहीं काल दिसतो व कांहीं काल दिसत नाहीं, म्हणून त्याचा नाश झाला असें कोणी म्हणूं शकेल काय? दिवसरात्र त्याचा प्रकाश जशाचातसाच कायम असतो. ज्या काळीं येथें रात्र असते त्या काळीं अन्यत्र दिवस असतो, हें जगप्रसिद्ध आहे. तद्वतच या धर्मज्ञान ईश्वरांशाचें स्वरूप मनुष्यमात्रांत एकसारखेंच असतां तें वेदविदांस क्षणोक्षणीं दिसतें व अज्ञांस त्याचा दुर्बोध होतो. जर वर्णाश्रमधर्म व कर्म यांचें श्रद्धेनें आचरण होत गेलें तर त्याची प्रेरणा सन्मार्गाकडे शीघ्र होऊन त्या मनुष्यास तो आपलें खरें स्वरूप प्रगट करून अज्ञानाचा समूळ नाश करितो. वर्णाश्रमधर्म सोडून निःशंकपणें आचरण करूं लागल्यास आरंभीं सन्मार्गानें चालण्याची प्रेरणा होते, परंतु त्या प्रेरणेकडे दुर्लक्ष्य झाल्यानें तिचा कांहींएक उपयोग न होतां, मनुष्य दिवसानुदिवस ज्यास्त गाढांधःकारांत शिरत जातो.

वेद, वेदवाणी व परमेश्वर यांची अभिन्नता वर स्पष्ट करून दाखविलीच आहे. म्हणजे नाममात्रांचा भेद आहे. सर्वांचें तत्व एकच सच्चिदानंद ब्रह्म आहे; तें निराकार आहे. तेव्हां त्याचा अंश होऊं शकत नाहीं. तथापि घटाकाशास महाकाशाचा अंश म्हटल्यानें कांहींएक बाध येत नाहीं. तद्वतच पदार्थमात्रांत ईश्वरांश आहे असें म्हणण्यास कांहींएक हरकत नाहीं, कारण सत्, चित् व आनंद हेंच त्याचें स्वरूप आहे. तें पदार्थाच्या स्थूलत्वानें मोठें होत नाहीं व सूक्ष्मत्वानें सूक्ष्म होत नाहीं. जें सच्चिदानंदस्वरूप अत्यंत स्थूल पदार्थांत आहे, तेंच अत्यंत सूक्ष्म पदार्थांत आहे. मनुष्य जगाचा एक अंश आहे आणि जगास सच्चिदानंद ब्रह्माचा आधार आहे तेव्हां; यासही तोच आधार आहे. या मनुष्यरूप अंशानें परिच्छिन्न असलेल्या सच्चिदानंदरूपास ही अंश संज्ञा बोध होण्याच्या सौकर्यार्थ दिली, वस्तुतः जें ब्रह्म तेंच हा अंशही आहे. येथवर सत्यस्वरूपाविषयीं दिग्दर्शन केलें तें सत्यस्वरूप प्राप्त करून घ्यावें कसें हें पुढल्या भागांत विवेचन करूं.

---

# भाग २ रा.

## धर्माचरण का अवश्य आहे ?

**स्ववर्णाश्रमधर्मेण तपसा हरितोषणात् ॥**
**साधनं प्रभवेत् पुंसां वैराग्यादिचतुष्टयम् ॥ १ ॥**
**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ॥**
**कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ॥ २ ॥**

गत भागांत सत्यस्वरूप धर्माविषयीं सांगितलें. आतां त्या स्वरूपाची प्राप्ति कशी करून घ्यावी याविषयीं बोलूं. वेदांत जे चार वर्ण सांगितले आहेत ते परमेश्वरानेंच सांगितले किंवा सर्व थोतांड आहे? जर परमेश्वर खरा आहे तर वेदवाणी खरीच असली पाहिजे व त्यांत सांगितलेले वर्ण व त्यांचीं पृथक्

पृथक् धर्मकर्मेंही सत्यच असलीं पाहिजेत. ईश्वरास मानलें असतां त्यानें सांगितलेल्या गोष्टीही अक्षरशः खऱ्या मानिल्या पाहिजेत. परमेश्वर किंवा वेद अनंत व निरंश असतांही त्याचा अंश धर्मज्ञानस्वरूपानें मनुष्यांत आहे. तेव्हां वेदवाणीचीं अंशरूप वर्णाश्रमधर्मकर्में त्या धर्मज्ञान स्वरूपांशावर अवलंबून असलीं पाहिजेत. कारण वेदवाणीनें परमेश्वराची ओळख परोक्षतेनें होते. त्याची ओळख अपरोक्षतेनें करून देणें या वर्णाश्रमधर्मकर्मांवरच अवलंबून आहे. कारण जवळ काय आहे हें पूर्वीं कळल्यावांचून पदार्थाचें ज्ञान कदापि करितां येत नाहीं—वर्णाश्रमधर्म सोडल्यानें परोक्षज्ञान होण्याचीही योग्यता राहत नाहीं; तेव्हां अपरोक्ष ज्ञानाचें नांव कोठून? वर्णाश्रमधर्माचा मुख्य उद्देश चित्तशुद्धि करणें होय. ह्मणजे चित्तास शब्दादि विषयांपासून काढून शरीरांत असलेल्या ईश्वरांशाकडेस प्रवृत्त करणें यासच चित्तशुद्धि करणें ह्मणतात. सत्व, रज आणि तम प्राणिमात्रांत आहेत. त्यांत सर्वांत श्रेष्ठ सत्वगुण आहे हें कोणीही कबूल करील. जे मनुजकोटींतील प्राणी सत्वगुणप्रधान उत्पन्न केले गेले ते ब्राह्मण होत. त्यांनीं शमदमादि साधनांनीं त्यांत असलेला सत्वांश वाढवावा व रज व तमांशास अगदीं निर्बल करण्यास समर्थ होऊन सच्चिदानंद परमेश्वराची ओळख करून अक्षय्य सुखांत निमग्न व्हावें;–सत्व व रजोगुणप्रधान जे उत्पन्न केले गेले ते क्षत्रिय होत. त्यांनाही योग्यतेनुसार सत्वांशास अनुसरून ब्राह्मणवर्णाचीं कर्में व रजांशास अनुसरून शौर्यादि कर्में सांगितलीं. या कर्मांच्या योग्य आचरणानें क्षत्रियही कालांतरानें सत्वप्रधान वर्णांत उत्पन्न होऊन सच्चिदानंद स्वरूपाची ओळख करून अक्षय्य सुखांत निमग्न होऊं शकतात. रज व तमोगुणप्रधान जे उत्पन्न केले गेले ते वैश्य होत. त्यांस त्यांच्या योग्यतेनुसार कृषि वाणिज्यादि कर्में सांगितलीं. त्यांच्या योग्य परिपालनानें तेही आपली योग्यता वाढवून उच्च वर्णांत उत्पन्न होतील. तमोगुणप्रधान जे उत्पन्न केले गेले ते शूद्र होत, त्यांचीं कर्में त्यांनीं वरिष्ठ तीन वर्णांची सेवा करावी. यावरून आपापलीं कर्में शुद्ध आहेत किंवा नाहींत याचा विचार विद्वान् लोकांनीं करावा. स्थिरचित्त झाल्यावांचून सुखप्राप्ति नाहीं व तसें घडण्यास नियमित ठिकाण असणें अवश्य आहे. मुलांस लिहिणें वाचणें शिकविण्याकरितां त्यांची चंचलवृत्ति मोठ्या अर्थज्ञानरहित अक्षरांवर जमवावी लागते. पुढें क्रमाक्रमानें तीं त्यांची ओळख करून अक्षरसंमीलनानें लेखन, वाचन व अर्थज्ञान करूं शकतात. हाच वर्णाश्रमधर्माचाही उद्देश आहे. परमात्म्याचें स्वरूप अतिसूक्ष्म असल्यामुळें सत्ववृत्तीनें ओळखतां येतें. ही वृत्ति वर्णाश्रमधर्मपालनावांचून साध्य होणारी नाहीं. इलाच ज्ञान किंवा संवितसंज्ञा आहे. ही उत्पन्न होतांच सच्चिदानंदस्वरूप अपरोक्षतेनें कळतें व अक्षय्य आनंदाचा आस्वाद मिळतो. या आनंदाची बरोबरी वैषयिक सुखाच्यानें लवमात्रही होणारी नाहीं. वर्णाश्रमधर्माच्या यथोक्त आचरणानें चित्तशुद्धि होते व लागलीच ईश्वरांश जो मनुष्यांत आहे तो सद्गुरुरूपानें प्रगट होतो व सगुण उपासना अर्पण करितो व ज्ञान होण्याचीं साधनेंही सांगतो. साधनसंपन्न होतांच स्वरूपाची ओळख पटते, ती इतकी कीं, जसें मुलांस लेखन वाचन. तसें त्यांस सच्चिदानंदावांचून कांहींएक भासत नाहीं. खाणें, पिणें, बोलणें इत्यादि जे व्यापार व्यवहारांत होतात ते सर्व सच्चिदानंदमयच भासतात. तात्पर्य, हजारों ग्रंथ वाचून अत्यंत जल्पना केली तरी सद्गुरुवांचून खरें ज्ञान प्राप्त व्हावयाचें नाहीं.

ज्यांनीं परमेश्वरास प्रसन्न करून वेदवाणी श्रवण केली, त्यांला सर्व वर्णांत श्रेष्ठ करून त्यांकरवीं सर्व वर्णांचीं धर्मकर्में प्रकट करविलीं. याच कर्मांच्या योग्य प्रतिपालनानें ईश्वरस्वरूप ओळखतां येतें. अशा ईश्वरप्रिय सत्वगुण ब्राह्मणांची सध्याची संतती इतकी कृतघ्न निपजली आहे कीं त्यांस या श्रेष्ठ कुलाची यत्किंचित्ही श्रेष्ठता वाटत नाहीं. विशेषेंकरून ब्राह्मण ज्ञातीच्या आधुनिक विद्वानांचा असा समज झाला आहे कीं ब्राह्मण ज्ञातींत उत्पन्न झालें काय व इतर जातींत उत्पन्न झालें काय सर्व एकच आहे.

कित्येकांस जातिभेद रुचत नाहीं. श्रेष्ठ वर्णाची ही स्थिति मग इतर वर्णाचें काय विचारावें. केवढी ही कृतघ्नता!!! ज्यांच्या पूर्वजांच्या मुखांत वेदवाणीनें वास केला होता त्यांच्या संततीस त्या वाणीचे वार

शब्द देखील न यावे व त्या वर्णाचा इतका कंटाळा यावा व वर्णाश्रमकर्में सोडून अर्थात् त्यांना तिलांजलि देऊन शूद्राप्रमाणें शेंडी फटकारून आनंदानें भोजन करावें व सर्व वेळ पैसा उत्पन्न करण्यांतच घालवावा व सत्वगुणप्रधानाचे तमोगुणी व्हावें. केवढा हा विपरीत परिणाम !!!

शरीरांत जो धर्मरूपी ईश्वरांश आहे त्याची सेवा करणें जें ब्राह्मणांचें मुख्य कर्तव्य कर्म समजलें जात असे, त्याची आतां मुळींच स्मृति होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर या कर्तव्यांत सर्व आयुष्य घालविणारे पूर्वीचे ब्राह्मण आळशी व मूर्ख होते असेही कुतर्क ऐकूं येतात. असो. पूर्वींचे ब्राह्मण या कर्तव्यांत सतत जागृत राहत असत ह्मणून त्यांनीं ज्ञानभांडार अशा प्रकारचा करून ठेविला आहे कीं सध्यांच्या संततीस तो समजणें देखील कठीण झालें आहे. पूर्वींचे ब्राह्मण आळशी, मूर्ख असते तर आर्यविद्या इतक्या श्रेष्ठत्वास कदापि न पोहोंचती. ते विषयसुखाचा तिरस्कार करून अक्षय्य सुखप्राप्तीकरितां रात्रंदिवस तत्पर राहत असत. पूर्वींच्या ब्राह्मणांचा कल सत्वगुण उत्पन्न करण्याकडे असे व सांप्रतच्या लोकांचा तमोगुणप्रवृत्तीकडे आहे, अर्थात् वैषयिकसुखाकडे आहे, व त्यांतच सर्व आयुष्य घालवून आनंद मानतात व विद्वत्तेची प्रौढी मिरवितात. सध्यां एम्. ए. बी. ए. पास केलेले शेंकडों विद्वान् आढळतात. परंतु पूर्वजांनीं जे मोठमोठे खऱ्या ज्ञानाचे ग्रंथ करून ठेविले आहेत त्यांच्या लक्षांश योग्यतेचा ग्रंथ यांजकडून तयार होऊं शकत नाहीं. याचें कारण या विद्वानांत खरी ज्ञानप्राप्ति झालेली नाहीं. सांप्रतच्या विद्येनें ब्राह्मणांत जो नैसर्गिक सत्वांश असतो तो क्षीण होऊन रजांश व तमांश मात्र प्रबल होतात तो व पूर्वींच्या विद्येनें रजांश व तमांश क्षीण होऊन सत्वांश प्रबल होत असे; व जसजसा सत्वांश प्रबल होत असे तसतसा ज्यास्त योग्यतेचा विद्वान् निघत असे. हा परिणाम वर्णाश्रमधर्माचा नव्हे काय ? वर्णाश्रमधर्माचा न मानावा तर सांप्रतकाळीं त्या धर्माच्या क्षीणतेनुसार पूर्वींच्या स्थितीस कां बाध यावा ? मागें जे उत्तम परिणाम झाले ते वर्णाश्रमधर्मप्रतिपाळणाचें फळ, व सांप्रत जी ब्राह्मणांची व इतर वर्णांची शोचनीय स्थिति झाली आहे ही धर्मअवहेलनेचें फळ, हें उघड वाचकांच्या लक्षांत येईल. मागें जसा विद्येचा परिणाम होत असे तसा न होतां सांप्रत त्याच्या उलट होत आहे. याचें कारण हें कीं पूर्वी विद्या ह्मणजे सत्वांश प्रबल करणें असें मानीत असत, परंतु सांप्रत त्याचे विरोधी रजांश व तमांश प्रबल करणें यासच विद्या मानतात. अर्थातच यापासून शरीरांत असलेल्या ईश्वरांशाची विस्मृति होणार. ज्या सत्वांशानें या विस्मृतीचा नाश होऊन ईश्वरांशाकडे वृत्ति लागावी, तो सत्वांश अगदीं मृतप्राय होत चालला आहे. जोंपर्यंत ईश्वरांशाची स्मृति व त्याच्या प्राप्तीचा मार्ग याकडे प्रवृत्ति होणार नाहीं, तोंपर्यंत जननमरणाच्या तडाक्यांतून न सुटतां जन्मजन्मांतरीं अधिकाधिक विपत्ति भोगणें भाग पडणार आहे. डोळ्यांपुढें दिसत असलेल्या दुर्विपाकपीडित लोकांच्या स्थितीवरून तरी आपल्या पुढच्या जन्माची काळजी करा. कारण, लोकांस जी विपत्ति भोगणें पडत आहे ती मागल्या जन्मीं आपापले वर्णाश्रमधर्म न केल्याचें फळ होय. पुढची काळजी करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्यकर्म होय. ती काळजी केवळ वृद्धापकाळच्या पोषणाचीच नव्हे, तर ईश्वरांशाची ओळख कधीं होईल व अक्षय्य सुख केव्हां मिळेल या विषयाची होय. ईश्वरानें ब्राह्मणांस सर्व साधनें करून ठेविलीं असून त्यांचा यत्किंचित्‌ही उपयोग न केल्यानें ईश्वराची अप्रसन्नता झाल्यावांचून राहिली आहे काय ? देशांत दिवसेंदिवस दारिद्र्य वृद्धिंगत होणें हा धर्मनाशाचा परिणाम नव्हे काय ? इतक्यावरही ब्राह्मण जातीचें लक्ष धर्मसंरक्षणाकडेस जाणार नाहीं तर पुढें ज्यास्त विपत्ति या देशावर येणार यांत अगदीं शंका नाहीं. मागें ब्राह्मणांपासून इतर वर्णांस धर्मबळ पोहोंचत असे. सांप्रत पूज्य जे ब्राह्मण तेच आपलें कर्तव्य विसरले, तर पूजक आपला धर्म कां विसरणार नाहींत ? ईश्वरांश जो मनुष्यांत आहे त्यानें दाखविलेल्या मार्गानें आचरण करून त्या ईश्वरांशाची ओळख करण्याचा प्रयत्न करणें यासच धर्माचरण ह्मणतात. ईश्वरस्वरूपाची ओळख करून घेण्याकरितां मनुष्यास इतर प्राण्यांपेक्षां ज्यास्त बुद्धि दिली आहे. व त्या बुद्धीस ईश्वरस्वरूप ओळखतां यावें याकरितां वर्णाश्रमधर्मकर्माची प्रेरणा केली आहे. इकडे आधुनिक विद्वानांचें लक्ष

नसल्यामुळें तीच स्थिति त्यांचे विद्यार्थ्यांस प्राप्त होत आहे. तेव्हां सांप्रत चालू असलेला प्रकार ईश्वरास कितपत मान्य असेल याची सहज कल्पना होईल. मुलानें बापाच्या मर्जीविरुद्ध कांहींएक आचरण केलें, तर तें बापास आवडेल काय ? बापाची कितीही अप्रसन्नता झाली तथापि तो मुलाचा प्राण न घेतां त्यास केवळ खाण्यापिण्याचा त्रास मात्र देईल. तद्वतच मनुष्यानें परमेश्वर जो सर्वांचा खरा पिता, त्याच्या मर्जीविरुद्ध आचरण केल्यास तो त्यास नानाप्रकारच्या यातना भोगवील. मुलास पश्चात्ताप होऊन जर त्यानें बापाची क्षमा मागितली तर बाप जसा मुलावर पुनश्च प्रेम करूं लागतो तसेंच आजपर्यंत झालेल्या धर्मविरुद्ध वर्तनाबद्दल पश्चत्ताप होऊन ईश्वराची क्षमा मागितली व त्यावर पूर्ण भरंवसा ठेवून जर वर्णाश्रमधर्मकर्में यथोक्त आचरण करूं लागलों तर तो ईश्वरही क्षमा करीलच करील. आणि नानाप्रकारच्या यातना ज्या सांप्रत होत आहेत त्यांतून वांचवील.

आहार, निद्रा, मैथुन, भय, कामक्रोधादिक प्राणिमात्रांस आहेत. परंतु बुद्धीची अद्भुत देणगी मनुष्यासच ईश्वरानें दिली आहे. या महत्वाच्या देणगीचा उपयोग सुखोपभोगाकडेसच करावा काय ? अशा प्रकारचा उपयोग झाल्यास पशु, पक्षी व मनुष्य यांत रूपमात्राचा भेद होईल. कारण इतर प्राण्यांस विषयभोगाचें ज्ञान आहेच. मनुष्यास चांगले भोग मिळतात, पशुपक्षांस भोग मात्र मिळतात; चांगले किंवा वाईट याचा त्यांस विचार नसतो. असें पाहिलें असतां सांप्रत मनुष्याची योग्यता पशुपक्ष्यांहूनही वाईट आहे. त्यांस संतुष्टता मुळींच नाहीं. जसजशा मनःकामना पूर्ण होऊं लागतात तसतसा लोभ अधिकाधिक वृद्धिंगत होत जातो व यामुळें मनुष्य, चित्ताच्या शांततेस मात्र, मुकत जातो. जर शांतताच नाहीं तर सत्ववृत्ति राहणार कोठून ? व ती ईश्वरांशाकडेस लागावी कशी ? बुद्धिरूपी महत्वाची देणगी ईश्वरानें ज्या उद्देशानें दिली आहे ( ह्मणजे ईश्वरस्वरूप ओळखून कृतकृत्य व्हावें ) तिचा उपयोग क्षणिक सुखसंपादन करण्यांतच व्हावा ना ! ! !

वर सांगितलेंच आहे कीं सच्चिदानंद जो मनुष्यांत आहे त्यानेंच वेदवाणीद्वारें सर्व धर्मकर्में पालन करण्यास सांगितलीं व प्रत्येक मनुष्य आपापले वर्णाश्रमधर्मानें चालतो किंवा नाहीं हेंही तोच पाहतो. जो धर्मास अनुसरून आचरण करितो त्यास जन्मोजन्मीं सुख प्राप्त होतें व जो धर्मविरुद्ध चालतो त्यास जन्मोजन्मीं विपत्ति भोगावी लागते; व जोंपर्यंत तो पश्चात्ताप पावून ईश्वराकडेस लक्ष लावीत नाहीं तोंपर्यंत तो जननमरणापासून मुक्त होत नाहीं.

धर्म नष्ट होत जात आहे, हें ईश्वर, अकालिकवृष्टि अवर्षणादि नानाप्रकारच्या संकटांत लोकांस टाकून प्रदर्शित करीत आहे परंतु इकडे कोणाचेंही लक्ष पोंहचत नाहीं. जोंपर्यंत ब्राह्मणांस आपले कर्तव्याची स्मृति होणार नाहीं तोंपर्यंत धर्म अगदीं मरणोन्मुख राहणार व देशांत अधिक विपत्ति होणार यांत तिळमात्र संशय नाहीं. सुख, धर्मस्वरूप परमेश्वरांतच आहे व ज्या ज्या कालीं या देशांत धर्मबल चांगलें होतें त्या त्या कालीं येथें सुखच होतें. हें या देशाचा खरा इतिहास जे पुराणादि ग्रंथ त्यांवरून कळण्यासारिखें आहे. परंतु पुराणें ह्मणजे सर्व भाकडकथा आहेत असा समज झाला; तेव्हां तीं वाचून पाहतो कोण ? पुराणाव्यतिरिक्त हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास कोठें सांपडावयाचा नाहीं. त्या ग्रंथांची प्रशंसा इतर देशवासी निस्पृह विद्वान् करितात परंतु ज्यांच्या कल्याणार्थ हे ग्रंथ तयार केले ते त्या ग्रंथांची निर्भर्त्सना करितात. जोंपर्यंत धर्मसंरक्षणाकडे लोकांची प्रवृत्ति होत नाहीं तोंपर्यंत देशसुधारणेच्या खटपटी व्यर्थ आहेत. किंबहुना त्या खटपटींपासून उलटा नाश मात्र होईल. जसें रोगी मनुष्यास पौष्टिक औषधें दिल्यानें त्याचे रोगाचें हरण न होतां उलट तो रोग प्रबल होतो. करितां त्याच्या रोगाचें चांगलें निदान ठरवून त्या निदानास अनुकूल चिकित्सा करावी ह्मणजे रोग लवकर बरा होतो. हेंच उदाहरण हिंदुस्थान देशास लागू आहे. तें असें कीं आजला या हिंदुस्थान देशास धर्मक्षीणतारूपी व्याधि लागली आहे. त्या व्याधीची चिकित्सा अद्यापि एकाही सुधारकास करितां आली नाहीं. त्यास ते सुधारणारूपी पौष्टिक देऊन त्याची

शक्ति अधिकाधिक क्षीण करीत आहेत. अशानें सुधारकांस कितीसें यश मिळेल हें देशाच्या दिवसेंदिवस होत असलेल्या वाईट स्थितीवरून उघड होईल. तेव्हां हाच निर्णय ठरतो कीं इतक्यावरही सुधारकांनीं पुढें असाच क्रम चालू ठेवल्यास देशाच्या दुर्दशेची अद्यापि पूर्णता होणें बाकी आहे. निदान या भीतीस्तव तरी सावध होऊन धर्माचरणास लागावें.

सदरील दोन भागांत धर्मशब्दाचा अर्थ आणि त्याच्या सिद्ध्यर्थ वर्णाश्रमधर्माची आवश्यकता या दोन गोष्टींचा बराच उलगडा झाला. वेद, धर्म, वेदवाणी हीं सर्व सच्चिदानंदस्वरूपाचीं नांवें आहेत. वर्णाश्रमधर्म परमेश्वरानेंच उत्पन्न केले व प्रत्येक वर्णाच्या सत्वरजतमांशाच्या योग्यतेनुरूप सर्व कर्मे यानें श्रुत करविलीं. असो.

पुढल्या भागांत धर्माचरणापासून सामाजिक स्थिति कशी उत्पन्न झाली हें पाहूं.

---

## भाग ३ रा.

**सजाति गुण होतसे सबल आत्मरूपासवें ॥ समीं विषम पावतां उभय ढाळती आंसवें ॥**
**जलासह जलास ये प्रबलता हुताशीं न ती ॥ समाज निज वर्णि हो ह्मणुनि पावण्या उन्नती ॥**

ज्या कालीं धर्माचा अर्थ मागील भागांत सांगितल्याप्रमाणें या देशच्या लोकांच्या मनांत बिंबला होता व तदनुसार त्यांचें आचरण होतें त्या कालच्या स्थितीची हल्लींच्या स्थितीशीं तुलना करून पाहिली असतां महदंतर व्यक्त होतें. आणि विचाराअंतीं फार खेद होतो. सध्यां विचार करणारास जर इतका खेद होतो, तर ज्या पूर्वजांनीं धर्मसंस्थापना करून सर्व समाजाची व्यवस्था त्या धर्मावर कायम केली, त्यांपैकीं कोणी एकादा ईश्वरेच्छेनें प्रगट होऊन हल्लींच्या स्थितीवर लक्ष पुरवील तर त्यास किती खेद होईल बरें ! याची कल्पना देखील करवत नाहीं. कोणीं एका मनुष्यानें अतोनात वेळ व चातुर्य खर्च करून एखादें अद्भुत काम तयार करून बाहेरगांवीं गेला. त्याच्या मागें त्याच्या अज्ञ मुलानें त्या कामाचा तसनस करून मग स्वबुद्धीनें तो त्या कामास सुधारूं लागला. पण इतक्यांत त्याचा बाप घरीं परत आला व पहातो तों मोठ्या परिश्रमानें केलेल्या कामाचा अगदीं नाश झाला; हें पाहून त्यास फारच फार खेद झालाच पाहिजे तद्वत् आमच्या पूर्वजांनीं मोठ्या चातुर्यानें ईश्वराच्या उद्देशानुरूप हजारों वर्षांच्या अनुभवानें तयार केलेली धर्मस्थापनारूपी इमारत अगदीं तसनस झालेली पाहून त्यास खेद कसा बरें होणार नाहीं ?

या धर्माचरणावर अर्थ, काम, मोक्ष अवलंबून आहेत. जर मूळच नाहीं तर फल, फूल येणार कोठून? तद्वतच धर्माचरण नाहीं तर धर्मवृद्धि होईल कोठून? व त्यापासून अर्थ, काम, मोक्ष यांची आशा तरी कशास करायाला पाहिजे? या देशाची सामाजिक स्थिति या चार पुरुषार्थांस अनुसरून कायम केली आहे. धर्म क्षीण झाल्यामुळें ती सामाजिक स्थितिही आवडेनाशी झाली आहे. व तिचा तसनस करण्याची हवी तशी खटपट चालू आहे. ज्या कालीं आपले लोकांची धर्मावर पूर्ण श्रद्धा होती त्या कालीं त्यांचा पराक्रम विद्या कलाकौशल्यें इत्यादि कोणच्या प्रकारचीं होतीं हें ग्रंथावलोकनानें समजण्यासारखें आहे. हें वर सांगितलेंच आहे कीं सांप्रत त्यापासून हित करून घेणें तर लांबच आहे. उलट पूर्वजांनीं केलेल्या प्रबंधांत दोष काढून स्वतःच्या विद्येची घमेंड मारितात. जर यांची आज या प्रकारची योग्यता आहे तर पूर्वजांच्या योग्यतेस पोंहचणें ह्मणजे त्यांस आकाशास चढण्यासारखें आहे. सांप्रत स्थितीविषयीं विचार करूं गेलें असतां दुःखाचे श्वासोच्छ्वास टाकण्यापलीकडे कांहींएक सुचत नाहीं. या शोचनीय स्थितीचें कारण सारासार विचार केला असतां समजण्यासारखें आहे. परंतु हा सारासार विचार नुसत्या इंग्रजी विद्येंत मोठमोठ्या परीक्षा पास करून होऊं शकत नाहीं, तर आमचें कोणतें हें नीट लक्षांत आणलें पाहिजे. आमचे पूर्वज ज्यांनीं प्रत्येक विद्या पूर्णतेस आणली व आर्यावर्ताच्या विद्वत्तेचा व सामाजिक स्थितीच्या श्रेष्ठत्वाचा डंका

ठाणे.

संपूर्ण भूमंडलावर वाजविला त्या पूर्वजांनीं वेदास पूज्य मानून त्याप्रमाणें अक्षरशः वर्तन [illegible] व-र्णांचा हा समज दृढ होता कीं वेदाज्ञेनें ब्राह्मण सर्वांत श्रेष्ठ आहेत, त्यांच्याखालीं क्षत्रिय, क्षत्रियांच्या खालीं वैश्य व सर्वांत खालीं शूद्र आहेत. प्रथमारंभीं ही सामाजिक स्थिति कायम होऊन प्रत्येक वर्ण आपापल्या योग्यतेनुरूप आचरण करून या सामाजिक स्थितीस बळकट करीत होता. चारही वर्ण एकमेकांशीं असे बद्ध असत कीं, एकाचें दुसऱ्यावांचून चालूं शकत नसे. प्रत्येक वर्णाचें पृथक् पृथक् कर्म असून तो त्या कर्मा-पासून इतर तीन वर्णांस लाभ पोंहचवीत असे. ह्यावरून त्या काळीं जें सुख प्राप्त होत असे तें सुख आतां लवमात्रदेखील मिळणें कठीण झालें आहे.

ब्राह्मणाचें हें कर्तव्य असे कीं, त्यांनीं तपश्चर्या व वेदाध्ययन करून ज्ञान संपादन करावें व इतर तीन वर्णांस वेदानुसार धर्मकर्माचें शिक्षण द्यावें. ह्मणजे क्षत्रियांनीं वैदिक धर्मकर्म व क्षात्रधर्म शिकून राज्या-दिक करावें; व गोब्राह्मणांचें रक्षण करावें. वैश्यांनीं व्यापार करून इकडचा माल तिकडे व तिकडचा इकडे आणून सर्वांची उणीव दूर करावी. शूद्रांनीं धान्यादि पदार्थ उत्पन्न करावे; सुतारकाम, लोहारकाम इत्यादि सर्वोपयोगी कामें करून इतर तीन वर्णांची सेवा करावी.

वेदांत भूत भविष्य वर्तमान हें सर्व कथन केलें आहे. अर्थात जगाची रचना व त्यांत होणाऱ्या घडा-मोडी ह्या सर्वांचा उल्लेख केला आहे. आह्मास अज्ञानामुळें एखादी गोष्ट नवीशी भासते पण तीच वेदवि-दांस जुनी आहे. पदार्थास व्यक्त व अव्यक्त अशा दोन अवस्था असतात हें वर सांगितलेंच आहे. ज्ञान्यास अव्यक्त स्थितीचाही बोध होतो व अज्ञान्यास तो पदार्थ व्यक्त झाल्यावर बोध होतो. ब्राह्मणांनीं तपबलानें व ज्ञानबलानें वेदसमुद्रांतून सर्व प्रकारची विद्या मंथन करून काढिली व तिचा प्रसार जगांत केला. समुद्रांत नानाप्रकारचीं रत्नें आहेत ही गोष्ट कोणीही कबूल करील. तद्वतच ज्ञानरूपी रत्नें वेदांत होतीं व तीं मनु-ष्यानें बुद्धिचातुर्यानें काढिलीं. व वेदाज्ञेप्रमाणें ज्या वर्णाचा जो धर्म तो त्यास शिकवून सर्व सामाजिक स्थि-ति कायम केली. जसा पूर्ण विश्वास ब्राह्मण वेदावर ठेवीत, तसाच पूर्ण विश्वास इतर तीन वर्णांचा ब्राह्मणांवर होता. व तदनुसार प्रत्येक वर्ण आपलें आचरण करून आपापल्या धर्मात निष्णात झाला. अशा प्रकारची व्यवस्था अगदीं पूर्वींपासून चालू झाली असावी असें माझें ह्मणणें नाहीं. सामाजिक स्थिति या योग्यतेस पोंहचण्यास हजारों वर्षें लागलीं असावीं. पूर्वी कोणतीही व्यवस्था नसावी. ह्या अवस्थेंत बराच त्रास वाटूं लागला असावा. नंतर दोघे चौघे एकत्र राहून काय सुख प्राप्त होतें याचा अनुभव घेते झाले असावेत. नंतर दहावीस जणांनीं एकत्र राहून आपापल्या मानसिक व शारीरिक योग्यतेनुसार पृथक् पृथक् कामें करून राहण्यांत काय सुख आहे याचा त्यांनीं अनुभव घेतला असावा. या प्रकारें वेदांनीं सांगितलेल्या प्रत्येक स्थितीचा अनुभव घेऊन त्या अनुभवावरून त्यांनीं सामाजिक स्थितीचा पालट केला असावा. जातिभेद क-सा झाला हेंही अनुमान ह्यावरून करतां येतें. मुळांत जातिभेद कसा तो नसावा. नंतर सत्त्वप्रधान लोकांची प्रवृत्ति ईश्वराराधनेकडेस झाली असावी व अशा पुरुषांतून ज्यांची आराधना पूर्णतेस पोंहचली त्यांस वेदवाणी श्रुत झाली असावी. या पुरुषांनीं ब्रह्म जाणलें; ह्मणजे शरीरांत असलेल्या सच्चिदानंद स्वरूपाची ओळख करून घेतली ह्मणून त्यांस ब्राह्मण ही संज्ञा प्राप्त झाली. अशा प्रवृत्तीचे लोक एकत्र होऊन ब्राह्मणवर्ग कायम झाला असावा. सत्त्वरजप्रधान लोकांची प्रवृत्ति ईश्वराराधनेशिवाय शौर्याचीं कामें करण्याकडेस झाली असावी. व या प्रवृत्तीचे लोक एकत्र होऊन क्षत्रियवर्ग कायम झाला असावा. रजस्तमःप्रधान लोकांची प्रवृत्ति व्यापारा-कडेस झाली असावी ह्मणून असे लोक मिळून वैश्यवर्ग कायम झाला असावा. ज्या लोकांची प्रवृत्ति इतर सर्वोपयोगी कामें करण्याकडे झाली ते लोक एकत्र होऊन शूद्रवर्ण कायम झाला.

अशा प्रकारें चार टोळ्या जमल्यानंतर त्यांचा प्रबंध करण्याची आवश्यकता त्यांस वाटली असावी. लहानसान कार्यांत प्रबंध करावा लागतो तर एवढ्या मोठ्या समूहाचा प्रबंध करण्याकडेस त्यांची प्रवृत्ति

होणें साहजिकच आहे. ब्राह्मणांसच श्रेष्ठत्व कां प्राप्त झालें, याचा आतां विचार करूं. सांप्रत जे विद्वानांत गणले जातात ते कोणांस ह्मणतात काय कीं आमचा आदर करीत जा. नाहीं. ज्या कोणास माहीत आहे कीं अमुक गृहस्थ शास्त्री पंडित किंवा एम. ए. बी. ए. आहे, तर तो गृहस्थ त्या शास्त्री, पंडित गृहस्थाचा आपण होऊनच मान करूं लागतो. ह्यावरून हें सिद्ध झालें कीं ही पूज्यता विद्येस आहे. व हें सांप्रत विद्येचा अतोनात विस्तार झाला आहे तरी पहाण्यांत येतें. तेव्हां ज्या काळीं ब्राह्मणावांचून इतर कोणीही विद्येंत पारंगत नव्हते त्या काळीं इतर तीन वर्ण यांचा केवढा मान राखून त्यांस किती पूज्य मानित असतील याची कल्पना सहज होऊं शकते. ईश्वरास प्रसन्न करून ते त्यास जसे प्रीतिपात्र झाले तसेच इतर तीन वर्णांसही प्रिय झाले. ह्या तीन वर्णांनीं त्यांस ईश्वराप्रमाणें लेखलें. तस्मात् ब्राह्मण आपल्या स्वतःच्या योग्यतेनें समाजांत श्रेष्ठत्व पावले. कोणावर वळजोरी करून ते श्रेष्ठत्वास पावले नाहींत. कारण लोकांची संपत्ति वळजोरीनें घेतां येते. परंतु श्रेष्ठत्व व कोणाची कोणाविषयींची पूज्यबुद्धि हीं वळजोरीनें प्राप्त करून घेतां येत नाहींत. ज्या कोणास लोकप्रीतीची चाड असेल त्यानें लोकांचीं मनें आकर्षणार्थ कांहीं अलौकिक गुण त्यांस दाखविले पाहिजेत. ब्राह्मण तपोनिष्ठ, शुद्धाचरणी, विद्वान व निस्पृह असे होते. त्यांचें स्वार्थाकडेस मुळींच लक्ष नव्हतें. त्यांच्या ह्या उत्तम आचरणानें व विद्यावलानें त्यांस इतर तीन वर्ण पूज्य मानूं लागले. व त्यांनीं सांगितलेलें प्रमाण मानूं लागले. समाजाचीं सूत्रें ह्या योग्यतेमुळेंच त्यांच्या हातीं आलीं व त्यांनीं किती उत्तम प्रकारची व्यवस्था केली हें त्यांच्या केलेल्या नियमांवरून लक्षांत येऊं शकतें. ब्राह्मणांत जोंपर्यंत स्वार्थबुद्धि शिरली नव्हती तोंपर्यंत त्यांची श्रेष्ठता समाजांत जशीचीतशीच कायम होती. ही स्वार्थबुद्धि त्यांच्यांत शिरतांच ते खालीं घसरले. सध्याचे ब्राह्मणांची योग्यता कशी आहे हेंही दिसतच आहे.

हजारों वर्षांच्या अनुभवावरून सामाजिक स्थिति ह्या प्रकारें कायम झाली असावी. जग उत्पन्न करण्याच्या वेळीं ईश्वराच्या मनांत अशी इच्छा उद्भवली कीं या देशांत ह्याच प्रकारचे समाज असावे. ह्या गोष्टीस श्रुति स्मृति प्रमाण आहेत. या इच्छेच्या प्रेरणेनें जे लोक ज्या योग्यतेचे होते ते त्या योग्यतेच्या समुदायांत मिळाले. व चार समुदाय मिळून एक समाज बनला. ही सामाजिक स्थिति इश्वरेच्छेस अनुसरून होती, ह्मणूनच त्या काळीं या देशांत निरतिशय सुख उपलब्ध होतें. सामाजिक स्थिति याच प्रकारची चालावी एतदर्थ पूर्वजांनीं स्वानुभवानें वेदास अनुसरून सर्व नियम बांधले. ज्या काळीं आर्यसमाज उत्तम स्थितींत होता त्या काळीं हिंदुस्थानची कीर्ति चहूंकडेस पसरली ह्यांत अगदीं संशय नाहीं. हें ग्रंथावलोकनानें कळून येईल. परंतु इतकी गरज आहे कोणास ? इंग्रजींत एक दोन परीक्षा करून पैसे मिळूं लागले ह्मणजे मनुष्य कृतकृत्य झाला, हा समज आबालवृद्धांत दिवसेंदिवस प्रबल होत आहे. पोटापलीकडे कांहीं तरी कर्तव्य असावें ही स्मृतीच विसरले. जो ज्ञानभांडार पूर्वजांनीं आमच्याकरितां सांठवून ठेविला आहे त्याचा आस्वाद या देशाच्या विद्वानांपैकीं सांप्रत ज्यांस मिळत असेल त्यांची संख्या बोटावर होण्यासारखी आहे. अशा पुरुषांची योग्यता ओळखणाराही मिळणें कठीण ! कारण जवाहिऱ्याच हिरा ओळखून त्याची किंमत काढूं शकतो. असे सत्पुरुष फारच विरळा सांपडतात. एखादा असला तर आसमंतात सर्व विपरीत दिसत असल्यामुळें तो बहुधा मौन धारण करूनच असतो. कारण त्यानें एखादी हिताची गोष्ट सांगितली तर तिजवर कोणाची श्रद्धा बसत नाहीं व उलट त्यास पाखंडी ठरवूं पाहतात. लोकांस ज्यापासून सन्मार्गाचें शिक्षण मिळेल त्याची त्या प्रकारें विटंबना करण्यास कांहीं लोकांची खटपट चालू असते.

ज्या कोणास इंग्रजी विद्येचा व्यासंग अगदीं नाहीं, किंवा ज्यास कांहींसा आहे असे लोक मात्र पूर्वजांची प्रशंसा करितात व त्यांनीं बांधून ठेविलेल्या नियमांनुसार आचरण करितात, परंतु धर्मकर्म आचारविचारांचा उद्देश जाणून त्यांचें आचरण करणारा क्वचित् सांपडतो.

धर्म ६-४

# भाग ४ था.

धर्माचरण क्षीण झाल्यापासून परिणाम.—पूर्वींच्या नियमांची सत्यता.—इंग्रजी शिक्षण व त्याचे परिणाम.

**विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेमृतोपमम् ॥**
**परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥**
**श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतस्तौ संपरीत्य विविनक्ति धीरः ॥**
**श्रेयोहि धीरोभिप्रेयसो वृणीते प्रेयो मंदो योगक्षेमाद्वृणीते ॥ १ ॥**

ज्या ब्राह्मण वर्णास इतर वर्णांचे लोक पूज्य मानीत असत त्यांची आजला अशी स्थिति व्हावी कीं गल्लोगल्लीं त्यांची फजिती होत आहे. त्याचें कारण हेंच कीं ज्या बलावर व गुणांवर त्यांनीं पूर्वी योग्यता व श्रेष्ठत्व संपादन केलें ते गुण व बल, सध्याच्या ब्राह्मणांत मुळींच राहिलीं नाहींत. बल नाहींसें झाल्यानें खालीं घसरणें साहजिकच आहे. जसें सरकारी काम नीटनेटकें न केलें ह्मणजे अधिकारावरून काढले जातात. निदान ५० वर्षांच्या पूर्वींच्या व आजच्या ब्राह्मणांच्या स्थितीविषयीं विचार करून पाहिलें असतां हें सिद्ध होतें कीं, जसजसे ब्राह्मण स्वधर्मापासून दूर होत आहेत तसतसे ते समाजांत घसरत आहेत. हल्लीं ब्राह्मणत्व केवळ शिखासूत्रापर्यंत मात्र येऊन ठेपलें आहे. आचारविचारांच्या नांवानें आंवळ्याएवढें पूज्य. तरी फुकटचा अहंपणा मात्र अतिशय वाढलेला दृष्टीस पडतो. इंग्रेजी विद्येनें पुनीत झालेल्या लोकांविषयीं तर बोलावयासच नको. ह्या विद्वानांपैकीं शेंकडा ९५ चा असा समज होतो कीं, आपले आचारविचार हें सर्व थोतांड आहे. जातिभेद, घातक धर्मकर्म, भिक्षुकांनीं पैसा उपटण्याकरितां लावले आहेत. विधवाविवाह चालू झाला पाहिजे, बालविवाह बंद झाला पाहिजे, स्त्रियांस शिक्षण व स्वतंत्रता मिळाली पाहिजे ह्या सुधारणा झाल्यावांचून देशास ऊर्जितदशा प्राप्त होऊं शकत नाहीं, ह्मणून ह्या सुधारणा करण्यास हवी तशी खटपट करूं लागतात. व स्वतः कृतकृत्य न झाल्यास आपलें मत तेंच देशाचें मत असें दर्शित करून बलात्कारानें राजद्वारा सुधारणा करवितात.

या देशांत हजारों वर्षांपासून चालत असलेल्या सामाजिक स्थितीविषयीं चांगला विचार करून इतर देशांच्या सामाजिक स्थितीशीं तुलना करून पाहिलें असतां स्पष्ट दिसून येतें कीं, ज्या नियमांवर येथील समाज स्थापन झाला त्या नियमांत व इतर देशांच्या सामाजिक स्थितीच्या नियमांत काडीमात्र ह्मणून साम्यता दिसत नाहीं. ज्याअर्थीं असा प्रकार आहे त्याअर्थीं अमुक एक देश अमक्या सुधारणेमुळें ऊर्जितदशेस आला ह्मणून ती सुधारणा येथेंही प्रचलित केल्यास हा देशही सुधारेल, ही समज अगदीं वेडगळ आहे. जोंपर्यंत हा भ्रम नाहींसा होत नाहीं तोंपर्यंत या देशाची दशा सुधारणार नाहीं. हिंदुस्थान देश प्राचीनकाळीं अत्युत्तमदशेंत होता, हें विधान अन्य देशच्या निस्पृह विद्वानांच्या ह्मणण्यावरून इकडील इंग्रेजीविद्याविभूषितांस आतां कळूं लागलें आहे. हें वर लिहिलेंच आहे. याबद्दल आह्मास अभिमान वाटावा, परंतु आधुनिक विद्वान व सुधारक लोकांची ही केवढी मोठी चूक ह्मणावी, कीं ते ह्या महत्वाच्या गोष्टीकडे मुळींच लक्ष देत नाहींत. (१) प्राचीनकाळीं हा देश अत्युत्तम स्थितींत कां होता? (२) त्या काळची सामाजिक स्थिति कोणत्या प्रकारची होती, व तिचे नियम कसकसे होते? (३) त्या अत्युत्तम स्थितीपासून आह्मी इतके खालीं कां घसरलों? ह्या महत्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून ज्या गोष्टींचा आमच्या सामाजिक स्थितीशीं कांहींएक संबंध नाहीं त्या गोष्टी ह्मणजे आचारविचार आपल्या समाजांत बलात्कारानें प्रचलित करून रात्रंदिवस समाजाची सुधारणा करून देशाची सुधारणा करूं पहात आहेत. ह्यांत आयुष्याचे दिवस वृथा व्यतीत होऊन आपसांत यादवी माजली आहे. ती कोणच्या प्रकारची हें पुढें निदर्शित करण्यांत येईल. तेव्हां या खटपटींनीं देशाची ऊर्जितदशा होण्याची कितपत आशा आहे याविषयीं पुढें सुधारकांनीं विचार करावा. कोणताही प्रबंध अनुभवानें करतां येतो. जसजसा अनुभव

येत जातो तसतसे नियम बांधतां येतात. व नियम बांधतां बांधतां जेव्हां कोणेक नवीन गोष्ट अनुभवास येतां दिसत नाहीं व जी गोष्ट अनुभवास येते ती पूर्वी बांधलेल्या नियमांनुसारच घडतां दिसूं लागते; तेव्हां खात्री होण्यासारखी आहे कीं, या अवधीपावेतों बांधलेले नियम सदोदित लागू होऊं शकतील. हा सिद्धांत प्रत्येक विषयाच्या बांधलेल्या नियमावरून सत्य ठरतो. उदाहरणार्थ, व्याकरण, गणित, पदार्थविज्ञान इत्यादि विषयांचे नियम त्या दोन विषयांत मूळपासून तों वर निर्दिष्ट केलेल्या अवधीपावेतों आलेल्या अनुभवांवरूनच बांधून त्यांस एकत्र करून एकास व्याकरण, दुसऱ्यास गणित इत्यादि अशा संज्ञा दिल्या; व या विषयांच्या नियमांची सत्यता निर्विवाद ठरवून ती पुढेंही तशीच राहील. हे सर्व नियम व्यवहारावरून निघाले आणि जर त्यांची सत्यता निर्विवाद आहे तर ज्या सामाजिक स्थितीच्या व्यवहारावरून हे गणितादि विषयांचे नियम ठरविले त्या सामाजिक स्थितीचे जे नियम आमच्या पूर्वजांनीं आमच्या हितार्थ ठरविले आहेत व जे सदोदित सारखे लागू होणारे आहेत ते आह्मास खोटे वाटावे काय? जर फळ गोड आहे असें आह्मी कबूल करतों, तर त्या फळाचा वृक्षही चांगलाच असला पाहिजे; व त्याचा नाश न होऊं देण्याविषयीं प्रयत्न केला पाहिजे. व्याकरण व गणित हे अगदीं भिन्न भिन्न विषय आहेत. तेव्हां गणिताचे उत्तमोत्तम नियम व्याकरणास उपयोगीं पडतील काय? तद्वतच इंग्लंड व हिंदुस्थान हे दोन्ही देश एकमेकांपासून अगदीं भिन्न आहेत. तेव्हां इंग्लंड देशाचे सामाजिक स्थितीचे व आचारविचारांचे नियम ह्या देशाच्या नियमांस व आचारविचारांस कसे लागू पडतील? देशाची सामाजिक स्थिति कांहीं वर्षांपूर्वी उत्कृष्ट होती हें निर्विवाद आहे, व ह्मणूनच हा देश ऊर्जितदशेंत होता. आतां जर देशाची स्थिति बिघडली आहे तर ती सुधारण्याचें व देश सुधारणेच्या खटपटीचें जें वेड त्यांचे डोक्यांत शिरलें आहे तेंही निघून जाईल. ज्या ज्ञातींत जो उत्पन्न झाला त्या ज्ञातीचा अभिमान जोंपर्यंत त्यास वाटत नाहीं तोंपर्यंत त्यास आपलें कर्तव्य अवगत होऊं शकत नाहीं.

तो आपल्या कर्तव्याकडेस लागणार कोठून? ह्मणजे क्षत्रियांस जर क्षात्रधर्माचा अभिमान वाटणार नाहीं, तर त्या धर्मांत निष्णात होऊन अर्जुनादिक क्षत्रियांची साम्यता करण्याचा प्रयत्न तर लांबच आहे. वैश्यास जर आपल्या धर्माचा अभिमान वाटणार नाहीं, तर तो नांवमात्र वैश्य राहणार; दाक्षिण्यादि गुण जे त्यास भूषण होत त्यांचा गंध देखील त्यामध्यें सांपडणें नको. तद्वतच ब्राह्मण ज्ञातीच्या लोकांस ब्रह्मकुलांत उत्पन्न होण्यांत कोणेक महत्व आहे असें वाटून त्याचा अभिमान त्यांस वाटणार नाहीं तोंपर्यंत त्यांस आपल्या कर्तव्याचें ज्ञान होण्याचा मुळींच संभव नाहीं. शौर्यादि गुणांवांचून जसें क्षत्रियास क्षत्रिय हें नाम शोभत नाहीं, तद्वतच शमदमादि जीं ब्रह्मत्वाचीं मुख्य लक्षणें, त्यांवांचून ब्राह्मणास ब्राह्मण ही संज्ञा लाजिरवाणी होय. वैषयिक सुखाची गोडी लागल्यामुळें षड्रिपूंनीं ब्राह्मणांस आपल्या पाशांत बद्ध केलें आहे, यामुळें वेदाध्ययन निस्सार वाटून त्याचा त्यांनीं त्याग केला आहे. व बहुधा सर्वांनीं इंग्रेजी शाळेचा अवलंब धरला आहे. त्या शाळांतील शिक्षणपद्धति आपलेपणा विसरविणारी आहे, असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. तस्मात् सांप्रत ब्राह्मणांस ब्रह्मत्वाचा खरा अभिमान मुळींच राहिला नाहीं. हाच प्रकार इतर ज्ञातींच्या लोकांचा समजावा. व त्यामुळें व्यक्तीपासून तों देशापावेतों परिणाम विपरीत घडत आहे. इंग्रेजी विद्येमुळें अविचारी व घातुक अशी स्वतंत्रता अतोनात शिरली आहे. यावत्प्राणी जगांत स्वतंत्रताप्रिय असतात. तेव्हां मुलेंही स्वतंत्रताप्रिय असणें अगदीं साहजिक आहे. परंतु लहानपणीं बुद्धीही कोमल व संस्काररहित असल्यामुळें योग्यायोग्य परिणामांच्या विचारांत प्रवेश न करितां तिला जसें वळण लावावें तसें ती घेत जाते. आणि त्या वळणांत तिला परिपक्वदशा प्राप्त झाल्यावर तिचें तें वळण कितीही प्रयत्न केले तरी सुटत नाहीं. मग त्या वळणाचा परिणाम वाईट होवो किंवा चांगला होवो. मुलांस परिणामज्ञान नसल्यामुळें मनास गोड वाटेल तो मार्ग घेण्याकडे तीं वळतात. परंतु ज्याचा आरंभ गोड त्याचा परिणाम बहुधा कडू असतो, यामुळें मुलास लहानपणापासून

स्वेच्छाचारीपणा मिळूं लागला तर तीं दुराचरणी व कुलकलंक अशीं निपजणें साहजिकच आहे. अशा रीतीनें नित्य ज्यांच्यांशीं त्यांचा सहवास घडूं लागतो त्यांच्यासारखें त्यांचें वर्तन व तदनुसार अन्तःकरणाचा कल होऊन तींच पुढें थोर झाल्यावर जातिभेदादिकांचा निषेध करूं लागतात. परंतु जातिभेद या देशांत कसा प्रचलित झाला व त्यापासून पूर्वी कोणता लाभ झाला असावा व हल्लीं कोणचें अहित होणार इत्यादि गोष्टींविषयीं गंभीर विचार करून त्याचें असणें चांगलें किंवा नसणें चांगलें याचा यथोक्त निर्णय करण्याचा कधींही प्रयत्न करीत नाहींत. याचप्रमाणें विधवाविवाह, स्त्रीशिक्षण व स्वातंत्र्य इत्यादि ज्या सुधारणा वर्तमानकाळीं शाळेंत शिकत असलेल्या मुलांपासून तों मोठमोठ्या हुद्यांवर असणाऱ्या लोकांच्या तोंडीं ऐकूं येत आहेत त्यांपासून हित किंवा अहित आहे याचा कोणीही विचार करीत नाहीं. याचें कारण हेंच कीं, असे विद्वान लोक स्वतांस विसरले ह्मणजे ज्या तत्वावर ब्राह्मण वगैरे भेद अनादिकालापासून स्थापित झाले त्या तत्वास विसरले आहेत. त्या तत्वास अनुसरून ब्राह्मणांस जें आचरण कर्तव्य असून तें ते न करितां व त्याचा यत्किंचित् अभिमानही न बाळगतां आह्मी ब्राह्मण आहों असें मोठ्या आढ्यतेनें ह्मणतात. शरीरांतून प्राण निघून गेला असतांही तें शरीर सजीव आहे हें ह्मणणें जितकें शहाणपणाचें आहे, तितकेंच वरचें ह्मणणें शहाणपणाचें आहे. आह्मी ब्राह्मण नाहीं असें ह्मणणें जर हे विद्वान् इच्छित नाहींत, तर त्या ब्राह्मणत्वाचा पूर्ण अभिमान बाळगून तें कायम ठेवण्याविषयीं प्रयत्न करण्यांतच यांच्या विद्येची प्रौढी आहे काय ? यांना हेंच उचित आहे कीं, ते ज्या सुधारणा या देशांत करूं इच्छितात, त्यांपासून या देशास कितपत हित होणारें आहे याचा पूर्ण निर्णय करून मग जें करणें तें करावें. त्यांनीं इंग्रेजी भाषाद्वारा इंग्रज लोकांचे व्यवहाराचें व सामाजिकस्थितीचें ज्ञान करून घेतलें तसें या देशाचेंही ज्ञान वेदशास्त्ररीत्या अवगत करून घ्यावें. त्यांस ब्राह्मणत्व निघून गेलें असतांही तें आहे असें वाटत आहे, तर त्या ब्राह्मणत्वाच्या व्यवहारांचें ज्ञान संपादन केलें पाहिजे. दोहों पक्षांचें चांगलें ज्ञान झाल्यावर या देशाची सामाजिक स्थिति व व्यवहार चांगला किंवा वाईट याचा बोध तत्क्षणींच होईल. मुलें कांहीं काळ अप्रतिहत त्या मार्गांत राहिल्यावर शेवटीं कुलास बट्टा लावणारीं अशीं निपजतात ह्मणून मुलांच्या पालकांनीं आपल्या मुलांस स्वेच्छाचारीपणानें न वागूं देण्याकडे नेहमीं लक्ष ठेविलें पाहिजे. परंतु मुलें एकदां शाळेंत जाऊं लागलीं कीं मग आईबाप मुलांच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करूं लागतात. यामुळें तीं लहानपणीं हवीं तशीं वागतात. याचा परिणाम असा होतो कीं, पुढें त्यांना आपला जन्म पशूंसही अप्रिय अशा पारतंत्र्यांत घालविणें भाग पडतें. ही स्वतंत्रता हिंदुस्थानचे सामाजिक स्थितीस फार अपायकारक आहे. त्या स्वतंत्रतेनें प्रियतेचाही नाश झाला. तस्मात् दिसण्यांत हिंदु ( ब्राह्मण वगैरे ) परंतु धड हिंदुही नाहींत व धड इंग्रजही नाहींत अशी स्थिति या देशाच्या संपूर्ण प्रजेची झाली आहे.

धर्मकर्म, आचारविचार सर्व ज्ञातींपेक्षां विशेषेंकरून ब्राह्मण ज्ञातींत नष्ट होण्याचें कारण लहानपणापासून इंग्रजी विद्येचा व्यासंग आणि मुलांच्या आचरणावर त्यांच्या पालकांचें दुर्लक्ष यावांचून दुसरें नाहीं. सुखप्राप्तीची इच्छा ही प्रत्येकास स्वभावतःच असते; परंतु खऱ्या सुखाचा वास कोठें आहे याविषयीं अज्ञान असल्यामुळें वरपंगी रम्यतेकडे मन वेधून जातें. आणि वरपंगी शोभा पैशाच्या आधीन असल्यामुळें तें लोभग्रस्त होतें; त्या लोभाचें आळें बुद्धीला आच्छादून खऱ्या सुखाचा विसर पाडतें. त्यामुळें बहुतेक पुढारी ह्मणविणाऱ्या आधुनिक विद्वानांचें असें मत आहे कीं, ईश्वर ह्मणून कोणीच नाहीं. ज्या घडामोडी होतात त्या स्वभावेंकरून होतात.

परंतु स्वभाव भाववाचक शब्द आहे, तेव्हां अर्थातच त्याची स्थिति कोणी स्वभावचालक व रोधक असल्यावांचून होऊं शकत नाहीं. मनुष्याचा स्वभाव त्याहून निराळा राहील काय ? हा संभव देखील होऊं शकत नाहीं. जर मनुष्य आपल्या स्वभावास चांगलें आटोक्यांत न ठेवील, तर त्यापासून कसे अनर्थ घडतील याचा अनुभव प्रत्येकास आहे. तेव्हां जग व त्यांतील अतर्क्य घडामोडी करण्याचा जो स्वभाव

त्याचा जर कोणी चालक व निरोधक नसता तर या घडामोडी विनचूक चालूं शकल्या असत्या काय ? या घडामोडी विनचूक चालत आहेत. ह्मणूनच मनुष्यास त्यावरून नियम काढून नानाप्रकारचीं पदार्थ-विज्ञान, रसायनादि शास्त्रें रचतां आलीं हेंच एक मोठें प्रमाण दिसत आहे. ह्या घडामोडी ज्या स्वभावें-करून घडत आहेत तोच परमेश्वर होय. स्वभाव मानला असतां परमेश्वराचें अस्तित्व मानणें भाग आहे. श्वेतता मानली असतां तिची स्थिति कोणत्या तरी पदार्थांत सांपडेल. निवळ कल्पना देखील करतां येणार नाहीं तरी प्रथम त्या पदार्थाचें अस्तित्व कल्पून नंतर त्याचा गुण अनुभवास येतो. तद्वतच स्वभाववादी, परमेश्वराचें अस्तित्व अवश्य घेऊन मानतात, परंतु अविचारामुळें त्याचें अस्तित्व नाकबूल करितात, हें स्वतः बोलत असून निजलों आहें असें बोलण्यासारखेंच चमत्कारिक आहे. परमेश्वरावांचून कोणतीही स्थिति प्राप्त होऊं शकत नाहीं, तेव्हां या अफाट जगाविषयीं बोलावयासच नको.

इंग्रजी विद्येचा प्रसार जसजसा अधिक होत आहे तसतसा ईश्वरावरील भरंवसा क्षीण होत आहे. लोभाचा नाश होऊन ईश्वरावर जोंपर्यंत भरंवसा बसत नाहीं तोंपर्यंत व्यक्तीपासून देशाचा पालट होणार नाहीं. कारण धर्माचा धर्म जो परमेश्वर त्यानें श्रुत करविलेल्या नियमांनुसार जी सामाजिक स्थिति या देशांत कायम केली आहे, तिच्या उलट सामाजिक स्थिति या देशांत कायम करण्याची खटपट सांप्रत अतोनात चालू आहे. परंतु ह्या आमच्या सामाजिक स्थितीपासून सुलभ रीतीनें प्राप्त होणारे चार पुरुषार्थ यांचा सर्वथैव नाश होणार आहे.

तीस वर्षांपूर्वी असा काल होता कीं लोक मुलांस इंग्रजी शिकवूं इच्छित नव्हते. कारण त्यांस व्यावहारिक ज्ञानानें असें निश्चयात्मक वाटत असे कीं ही विद्या आमचा धर्म नाश करील. त्या कालीं कित्येक असे बाणेदार गृहस्थ होते कीं त्यांना सरकारांतून पेनशन, जाहगीर इत्यादि उत्पन्न होतें परंतु त्यांनीं ह्या गोष्टीची परवा देखील केली नाहीं. कारण त्यांचा असा पक्का समज झाला होता कीं हा पैसा आमचा धर्म नाश करणारा आहे. अशा पुरुषांस आधुनिक विद्वान् मूर्ख ह्मणतात. परंतु त्या कालच्या सामाजिक स्थितीची व सांप्रतकालच्या सामाजिक स्थितीची तुलना करून पाहिली असतां त्या लोकांचा समज मूर्ख-पणाचा किंवा शहाणपणाचा होता हें कळून येईल. त्यांचा ईश्वराच्या ठिकाणीं असा दृढ विश्वास होता कीं, सरकारानें लोभ दाखविला असतांही ते त्यांत बद्ध झाले नाहींत. असे बाणेदार पुरुष विरळा. हितावह दिसणारें काम करण्याकरितां सकृत्‌दर्शनीं लोकांचा भरणा विशेष होता, तथापि त्या वेळीं धर्म बुडेलअशी भीति बाळगणारे लोक पुष्कळ होते. यामुळेंच आरंभीं सरकारास शाळा चालू करण्यांत बरेच प्रयास पडले. जें काम इतर साधनानें सिद्धीस जात नाहीं तें लोभ दाखवून तावडतोब सिद्ध होतें. ह्या नीतीस अनुसरून सरकार चाललें. धर्म बुडेल किंवा नाहीं याचा जे लोक कांहींएक विचार न करितां आपलीं मुलें शाळेंत पाठवूं लागले त्यांची सरकारांत प्रशंसा होऊं लागली व मुलांस नेहमीं इनामें मिळूं लागलीं. हें पाहून आणखी बरेच लोकांनीं आपलीं मुलें शाळेंत पाठविलीं. त्या कालीं इंग्रजीस नुकताच आरंभ झाला होता. ह्मणून सरकारास लिहिणाऱ्यांची विशेष जरूर होती. फारशी इंग्रजी थोडेंबहुत लिहितांवाचतां आलें ह्मणजे त्याची मोठी प्रशंसा व्हावी व त्यास मोठमोठ्या अधिकाराच्या जागा द्याव्या. असा प्रकार पाहून बहुधा सर्व प्रकारचे लोक ह्या पाशांत बद्ध झाले. स्वसंतोषानें आपापलीं मुलें शाळेंत पाठवूं लागले. क्रमाक्रमानें त्यांचा असा समज झाला कीं इंग्रजी शिकलें असतां शेंपन्नास रुपये घरीं बसून विनदिक्कत महिन्याच्या महिन्यास मिळून दारिद्र्य दूर होईल. आजला हा समज पूर्णतेस पोहोंचला आहे. लोकांस आपापले रोजगार करणें जड वाटूं लागलें आहे, व सरकारी नौकरीची हौस वाढूं लागली आहे. ह्यांत पुढारी बहुधा ब्राह्मण आहेत. कारण पेशवाईपासून ब्राह्मणांस वैषयिक सुखाची विशेष गोडी लागून बहुतेकांनीं वेदाध्ययन करणें सोडून देऊन कारकुनी धंदे पत्करले, अशा लोकांस गृहस्थ ह्मणूं लागले, व ज्यांनीं वेदाध्ययन सोडलें नाहीं त्यांस भट भिक्षुक ह्मणूं लागले. अशा दोन फळ्या ब्राह्मणज्ञातींत झाल्या. पेशवाई

बुडाल्यावर बहुधा सर्व कामदारांस इंग्रज सरकाराकडून पेनशन दिलें गेलें. तें घेऊन त्यांनीं आपला चरितार्थ चालवावा. पुढें त्यांच्या संततीस तें पेनशन मिळण्याची आशा राहिली नाहीं. पेशवाईत कामगिरीच्या संबंधानें जे गृहस्थ बनले ते बनलेच. वैदिक भिक्षुक ब्राह्मण पूर्वीं श्रेष्ठ समजले जात, परंतु पेशवाईत गृहस्थ लोकांत संपत्ति वाढल्यामुळें ते अधिक संभावित गणले गेले. वैदिक भिक्षुक खालीं घसरले. प्रथम सर्व ब्राह्मण एकाच वर्गांत मोडत. वेद जाणणारास मात्र श्रेष्ठ मानीत. गृहस्थ व भिक्षुक असे दोन वर्ग जरी कायम झाले तरी कांहीं काळपावेतों (ह्मणजे पेशवाई संपेपर्यंत) वैदिकांचा मानसन्मान बराच होता. ते जसजसें आपलें कर्तव्य विसरत चालले तसतसा समज असा उलट होऊं लागला कीं, भिक्षुकी करणें हलकट आहे. पेशवाईत गृहस्थ बनलेल्यास पेशवाईनंतर मुलास वेदाध्ययन करविणें ही मोठी शरमेची गोष्ट आहे असें वाटूं लागलें. अशा गृहस्थास आपल्या मुलांस इंग्रजी शिकविणें भाग आलें. इंग्रजी राज्यांत उंच नीच हा भेद उरलाच नाहीं व हा भेद द्वेषाचा आहे असा समज हल्लीं आहे. सर्व लोकांनीं पिढ्यान्‌पिढ्यांचे आपले धंदे सोडून मुलांस शाळेंत पाठवूं लागले. ह्यास कारण ब्राह्मणज्ञातीच झाली. वेदाध्ययन करणें हें जें मुख्य कर्तव्य तें त्यांस निंद्य वाटलें व त्यांनीं त्याचा त्याग करून ते धर्मच्युत झाले. यांचें पाहून इतर ज्ञातींच्या लोकांनींही आपापले धंदारूपी धर्म सोडून दिले. ब्राह्मणापासून तों कोष्टी माळ्यापर्यंत असा समज झाला आहे कीं इंग्रजी चाकरीवांचून चरितार्थ करण्यास दुसरें साधनच नाहीं. व त्या चाकरीसारखें सुख नाहीं. तस्मात इंग्रजी विद्येचा अर्थ चाकरी मिळविणें. ज्याच्या त्याच्या तोंडीं मुलगा काय शिकतो तर उत्तर इंग्रजी शिकतो, एक दोन परीक्षा पास झाल्या ह्मणजे तो दरिद्र दूर करील. कारण २५-३० रुपये महिन्याची चाकरी त्यास सहज मिळेल.

प्रथम जे गृहस्थ बनले ते थोडाबहुत तरी धर्म बाळगून होते व वैदिकांचा बराच मानसन्मान राखून ते त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें चालत. आतां विपरीत स्थिति आहे. पूर्वीच्या गृहस्थांची संतती इंग्रजींत निष्णात झाल्यामुळें त्यांस ब्रह्मकर्म सर्व थोतांड वाटूं लागलें. मग ते या वैदिक भिक्षुकांस जुमानतात कशाला? दुसरे भिक्षुकही स्वधर्मभ्रष्ट झाले. वेदाध्ययन करविणें हें जें ब्राह्मणाचें कर्तव्य कर्म तेंही विसरले, व त्यांचीं आचरणें अगदीं अशुद्ध झालीं. वेदावरचा त्यांचा विश्वास नाहींसा झाला. वेदाध्ययनानें चरितार्थ चालणें कठीण. सरकारी चाकरीनें चरितार्थ उत्तम चालूं शकतो. हा भ्रम स्वधर्मविस्मृतीमुळें झाला. धर्मभीति गेली ह्मणजे लोभ मनुष्यास लागलींच पाशांत बद्ध करतो. त्या लोभांत फसून बहुतेक वैदिक भिक्षुक लोकांनींही आपल्या मुलांस शाळेंत घालणें सुरू केलें. याचा परिणाम असा झाला कीं ज्या ठिकाणीं १५ वर्षांपूर्वी ५० वैदिक होते तेथें आतां दोघे चौघे असून तेही जुन्या लोकांपैकीं शेष राहिलेले आहेत. बहुतेक सरकारी चाकरीच्या संबंधानें गृहस्थवर्गांत मिसळले. कित्येक याज्ञिकी शिकून चरितार्थ करीत आहेत. आतां यांचीं मुलें शाळेंत अभ्यास करितात, तेव्हां त्यांस अनायासेंच संध्येची मारामार पडली पाहिजे. वेद किंवा याज्ञिकी विषयाचें नांवच काढावयास नको. भिक्षुक आपलें कर्तव्य विसरले. आपलें आचरण अशुद्ध करूं लागले व याबद्दल त्यांना दंड नवीन सुशिक्षित मंडळीकडून होत असलेल्या फजितीद्वारें मिळतच आहे. इतकें असूनही त्यांना त्यांच्या कर्तव्याची स्मृति होत नाहीं! गृहस्थांविषयीं पहावें तर त्यांस वेदाध्ययन करविण्यांत लज्जा वाटूं लागली, अर्थातच ते आपलें कर्तव्य विसरले; पण जे आजपर्यंत या वर्गांत आहेत, त्यांनीं कां मुलांस वेद शिकवूं नये? सांप्रत ब्राह्मण ज्ञातीची जी शोचनीय दशा झाली आहे ती स्वधर्म सोडल्यामुळेंच. जोंपर्यंत नोकरीचा नाद सुटत नाहीं व स्वधर्मास शरण जात नाहींत तोंपर्यंत या ज्ञातीस ऊर्जितदशा प्राप्त होत नाहीं.

चाकरीविषयीं विचार केला तर तीही पूर्वीपेक्षां दुर्मिळ झाली आहे. तिची दिशा अगदीं उलटी झाली आहे. पूर्वीपेक्षां योग्यतेची गरज फार असून, वेतनाचा दर कमी झाला आहे. ज्या योग्यतेच्या लोकांची सुरू अमलदारींत प्रशंसा होत असे व मोठमोठ्या योग्यतेच्या जागा त्यांस मिळत असत त्यांच्यापेक्षां दसपट

जास्त योग्यतेच्या लोकांची आतां अगदीं पायमल्ली होत आहे. महिन्यांचे महिने घालविल्याखेरीज त्यांस चाकरी मिळत नाहीं; अशा लोकांस यदाकदा चाकरी मिळाली तर त्यांना अमलदाराची मर्जी राखणें जड जातें. कारण इंग्रजी समाजाच्या स्वतंत्रतेचें ज्ञान त्यांस भरपूर झालेलें असतें. व जातीच्या व्यवहारिक ज्ञानाचा अभाव असतो यामुळें अधिकाऱ्यांशीं, त्यांच्या भाषेनें शिकविलेली जी स्वतंत्रता तिचें अवलंबन करूं पाहतात. अधिकाऱ्यांस हें मुळींच आवडत नसल्यानें चुरसाचुरस सुरू होते व कधीं कधीं परिणाम फारच शोचनीय होतात. इंग्रज अधिकाऱ्यांशीं हिंदु लोकांनीं स्वतंत्रतेनें वागावें हें त्यांस पसंत न पडण्याचें कारण ईश्वरीकोपाखेरीज दुसरें ह्मणतांच येत नाहीं. त्यांनीं इंग्रजी विद्याद्वारें हिंदु लोकांस त्या विद्येचें अंगभूत जो इंग्रजी व्यवहार व समाजस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य यांचें ज्ञान शिकविलें, मग हिंदु लोकांनीं अधिकाऱ्याशीं स्वतंत्रतेनें कां वागूं नये, असें आधुनिक विद्वान् मोठ्या ऐटीनें ह्मणतात. याचें कारण हेंच आहे कीं, आधुनिक विद्वान् आपलेपण ह्मणजे आर्यत्व अगदींच विसरले. आपले आचारविचार रीतिभाति हिंदु लोकांनीं सोडूं नये ही गोष्ट सरकार उघड बोलून दाखवित नाहीं. परंतु अप्रसन्नतेनें प्रदर्शित करितात. पण तें कोणाचे लक्षांत येत नाहीं. आह्मी इंग्रज नाहीं. असें त्यांस पक्कें माहित असून त्यांची जी इंग्रजी विद्या तिच्या बलावर त्यांच्याशीं स्वतंत्रतेनें वागूं पाहातात. कावळ्यानें मोराचे पंख लावून मोराची घमेंड मारली ह्मणून मोर का त्याचा आदर करील ? नाहीं, मोर तर त्याची फजिती करण्यास चुकणार नाहीं.

हाच प्रकार इंग्रज अधिकारी व हिंदु विद्वान् यांत व हिंदुहिंदूंत घडून राहिला आहे; परंतु आधुनिक विद्वानांच्या लक्षांत ही महत्वाची गोष्ट अद्याप येत नाहीं. ह्याचा विसर पडल्यामुळें ईश्वराचा कोप हिंदु लोकांवर झाला आहे. व याबद्दल शिक्षा होत असलेल्या दुर्दशेवरून मिळत आहे हें स्पष्ट आहे. तथापि आपलेपण अद्याप त्यांस स्मरत नाहीं.

नानाप्रकारची विपत्ति या देशांत वृद्धिंगत होत आहे, त्यावरून ईश्वर असें सुचवितो कीं, इंग्रजी विद्येचा नाद सोडून मजवर पूर्ण भरंवसा ठेवून ज्याचा जो धर्म आहे त्याचें त्यानें अनुकरण करावें व हेंच श्रेयस्कर होईल. करुणासागर भक्तवत्सल अशा सूचना करीत असतांही त्या कोणाच्या लक्षांत येत नाहींत. तस्मात या देशांत अद्याप विपत्ति वाढविण्याची अपेक्षा आहे. याची भीति वाटत असल्यास ब्राह्मणांनीं स्वधर्मास शरण जावें ह्मणजे तो त्यांचें संरक्षण करील. व संपूर्ण देशास संपत्ति व बल प्राप्त होईल.

सर्व प्रकारच्या लोकांनीं आपापले धंदे सोडल्यामुळें सर्वच धर्मच्युत झाले. उंचनीच सर्वांची प्रवृत्ति चाकरी मिळविण्याकडे झाली व चाकरी करणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत जात असल्यामुळें इंग्रजी शिकलेल्या लोकांची किती योग्यता घटली हें सांप्रत प्रत्यक्ष दिसत असतांही लोकांचे डोळे उघडत नाहींत. थोडें शिकलेले व हलक्या प्रतीचे लोक अधिकाऱ्याची मर्जी हवी तशी राखूं शकतात. परंतु आपल्यास उंच मानणारे जास्त शिकलेले लोक त्यांच्याप्रमाणें अधिकाऱ्यांची मर्जी राखूं शकत नाहींत. कारण नम्रतेनें वागणें इंग्रजी ज्ञानाला विरुद्ध आहे. यामुळें अशा लोकांस चाकरी मोठ्या अडचणीनें मिळते. वास्तविक पाहिलें असतां चांगल्या चांगल्यांस चाकरी मिळणें कठीण झालें आहे. सरकार वेळोवेळीं बोलून दाखवीत आहे कीं चाकरी करणारांची व मागणारांची संख्या फार झाली आहे. सर्वांस चाकरी मिळूं शकत नाहीं. विद्या देणें सरकाराचें काम आहे. चाकरी देण्याचें जिम्मेदार सरकार नाहीं. विद्या शिकून लोकांनीं आपापले धंदे करावे व उदरनिर्वाह करावा. परंतु चाकरीच्याच उद्देशानें संपादन केलेले ज्ञानाच्या बलावर त्यांस स्वतःचे धंदे करण्याची शक्ति अगदींच राहत नाहीं. परंतु ही उणीव दूर करण्याकरितां सरकारानें टेक्निकल शिक्षण शाळांतून जारी केलें, परंतु त्यापासूनही चाकरी पलीकडेस कोणता उपयोग होतो असें दिसत नाहीं. चाकरी मिळाली तरच शाळेंत शिकलेल्या विद्येचा उपयोग, नाहीं तर कांहींच अर्थ होत नाहीं, किंबहुना इंग्रजी शिकलेल्यास रोजगारधंदे शिकण्यास

ठाणे.

लज्जा प्राप्त होते. ह्यामुळें ब्राह्मणांचें ब्राह्मणत्व गेलें व इतर धंदेवाल्यांचें कलाकौशल्य [illegible] कोणी तरी सुधारक लक्ष पुरवीत आहे काय ?

ज्या शाळांत पूर्वी फुकट शिकणारे विद्यार्थी मिळण्याची मारामार होती त्या शाळांत आतां फी व इतर खर्च चौपट लागून इतके विद्यार्थी शिकत आहेत कीं आह्मांस जास्त विद्यार्थी नकोत असें सरकारास ह्मणणें भाग पडत आहे. परंतु लोकांचें इंग्रजी विद्या शिकण्याचें वेड कांहीं दूर होत नाहीं. सरकार जसजसें आपलें अंग काढून पहात आहे तसतसे हिंदुस्थानचे लोक इंग्रजी शिकण्याची जास्त अभिरुचि दाखवीत आहेत. कारण चाकरी मिळण्याची आशा. मुलांस आपल्या धर्माचें व धंद्याचें शिक्षण देणें लज्जास्पद झालें आहे. फार झालें तर वकिलीचा अभ्यास करवितात. एवढ्यानें तरी आपण कृतकृत्य होऊं असें ते समजतात. धंदेवाल्यांनीं आपले धंदे करणें हाच त्यांचा धर्म होय. पूर्वी हा समज दृढ होता ह्मणूनच त्या लोकांची चित्तवृत्ति स्थिर राहून त्यांस स्वार्थ व परमार्थ हे दोन्हीही साधत असत. व ह्यामुळेंच प्रत्येक कलाकौशल्य पूर्णतेस पोंहोंचलें होतें. धंदे सोडले ह्मणून हे लोक धर्मच्युत झाले व ऐहिक व पारमार्थिक सुखास मुकले. कारण सत्वगुण वाढवून चित्तवृत्ति स्थिर करण्याचें जें साधन तें आतां नाहींसें झालें. कलाकौशल्याचें नाम मात्र राहिलें आहे. जे महत् कीर्ति संपादन करून गेले त्यांची संतति हल्लीं इंग्रजी विद्येंत निमग्न आहे. स्वतःचा धंदा शिकविणारा असा विरळाच आढळतो. ज्यांच्या कारागिरीची प्रशंसा सर्व भूमंडळावर गाजत होती, त्यांच्या संततीची अशी दशा व्हावी कीं त्यांचें कर्तव्य त्यांस स्मरत नाहीं. ज्या कारागिरांस १०।१२ वर्षांपूर्वी कोणी विचारीत नसे, त्यांस आतां सुदैवेंकरून डोकें वर करण्यास फावत नाहीं. कारण कारागिरांची संख्या कमी झाली. परंतु त्यांच्या कामाची गरज पूर्वीप्रमाणेंच आहे. पूर्वीच्या उत्तम कारागिरांपेक्षां हल्लीं कारागीर ह्मणविणारांस दिढीदुपटीनें पैसा अधिक मिळतो. ज्यांनीं आपापले धंदे सोडून दिले त्यांची स्थिति किती वाईट पाहण्यांत येते! स्वधर्म सोडल्यानें हा त्यांचेवर ईश्वरी कोपच झाला असें समजा. यांत संशय नाहीं. जे जातिभेद पूर्वी धंद्याच्या सौकर्यार्थ सामाजिक स्थितींत उत्पन्न झाले होते, ते धंदे आतां नाहींसे होत जात आहेत. धंदारूपी जीवाचीं जातिभेदरूपी मृत शरीरें अद्याप जीव निघून गेल्यावर मृत शरीराप्रमाणें कायम राहिलीं आहेत, त्यांचेंही जाळून भस्म करण्याची आधुनिक विद्वान खटपट करीत आहेत. परंतु या जातिभेदापासून किती लाभ झाले हें लक्षांत आणून पुनश्च ते कायम ठेवण्याची कोणीतरी खटपट करीत आहे काय ? असें होण्याचें कारण हें कीं, आपलें कोणतें व त्याची किंमत किती ह्याचा निर्णय करण्याचें जें साधन स्वधर्म जाणणें हें त्यांस मुळींच माहीत नाहीं.

शाळेंत विषयही अशा प्रकारचे शिकविले जातात कीं त्यांपासून हिंदुस्थानच्या सामाजिक स्थितीचें व व्यवहाराचें ज्ञान स्वप्नांत देखील होण्याचा संभव नाहीं. हिंदुस्थानचे इतिहासापासून हें ज्ञान व्हावें, पण तें न होण्याचें कारण उघडच आहे कीं, या देशाच्या सामाजिक स्थिति व व्यवहाराविषयीं अनभिज्ञ असे जे पाश्चिमात्य विद्वान् त्यांनीं आपल्या सामाजिक स्थितीस व व्यवहारास जें उक्त त्याचेंच त्यांनीं इतिहासांत वर्णन केलें आहे, किंबहुना ज्या गोष्टी त्यांच्या विचारांच्या विरुद्ध दिसल्या त्यांची निंदा केली असें ह्मटल्यास कांहींएक बाध नाहीं. कारण हा देश अति निकृष्ट स्थितीपासून अत्युत्तमदशेस पोंचण्याचीं जीं मुख्य कारणें वर्णाश्रमधर्म, सामाजिक स्थिति, व्यवहार, आचारविचारादिकांचें कथन मुळींच सांपडत नाहीं. घसरता पाया लागल्यापासूनची मात्र हकीकत लिहिली आहे. पाश्चिमात्य इतिहासकारांनीं वर्णन करतांना आपलें चातुर्य असें कांहीं खर्च केलें आहे कीं जीं कारणें वास्तविक ह्या देशाच्या उन्नतीचीं आहेत तीं कारणें त्यांनीं ह्या देशाची निकृष्ट स्थिति करणारीं आहेत असें दाखविलें आहे. तेव्हां अर्थातच आमचें आह्मांस वाईट वाटूं लागलें. हिंदुस्थानचा खरा इतिहास हजारों वर्षे मागें गेल्यावांचून मिळूंच शकत नाहीं. हा खरा इतिहास पुराणांतरीं मिळणारा आहे. परंतु तीं सर्व पुराणें

कल्पित आहेत असा आधुनिक विद्वानांचा समज झाला आहे. तेव्हां पाश्चिमात्य इतिहासकारांनीं असें कां समजूं नये ? विदेशी निस्पृह विद्वान मात्र या पुरातन ग्रंथांची प्रशंसा करितात आणि तोंडांत बोटें घालून ह्मणतात कीं, ज्यांचेकरितां हे ग्रंथ लिहून ठेविले आहेत ते आर्य लोक ह्यांस विसरले. सध्यां चालू असलेल्या इतिहासांत मुसलमानी कारकीर्दीपासून तों इंग्रज लोकांच्या हातीं हा देश कसा आला व राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारची चालू झाली इत्यादि गौण गोष्टी त्यांत आढळतात. अशा इतिहासापासून आह्मांस काय उपयोग. आमचें काय व त्याची काय योग्यता हें मुळींच उमगूं शकत नाहीं, परंतु त्याबद्दल द्वेषबुद्धि मात्र उत्पन्न होऊन जें थोडेंबहुत आमचें आहे त्याचाही नाश करण्याकडे आधुनिक विद्वानांची प्रवृत्ति होते. हिंदुस्थानच्या चालू असलेल्या इतिहासापासून परीक्षेंत पसार होण्यापलीकडे कांहींएक उपयोग नाहीं. ज्या समाजांत ज्याचा जन्म झाला असेल त्यास त्या समाजाचें ज्ञान होणें अत्यावश्यक आहे. ही आवश्यकता पूर्ण करण्याचें साधन हल्लीं कोणतेंही प्राप्त नाहीं. ही उणीव जोंपर्यंत दूर होणार नाहीं तोंपर्यंत आमचें कोणतें व त्याची किती योग्यता आहे ह्याचा मुळींच बोध होऊं शकणार नाहीं.

शाळेंत विदेशी भाषेच्या द्वारें विदेशी व्यवहारांचें ज्ञान होतें, तेव्हां आमच्या सामाजिक स्थिति व व्यवहारादिकांचें ज्ञान होण्याची मुळींच आशा उरली नाहीं. बरें, घरांतही व्यावहारिक ज्ञान प्राप्त होण्याची आशा असेल असें ह्मणावें तर तेथेंही नाहीं. त्याची अवहेलना मात्र होत आहे. २५ वर्षांत जे इंग्रजी शिकले आहेत त्यांपैकीं बहुतेकांना स्वतःच्या व्यवहारादिकांचें ज्ञान नसल्यामुळें त्यांनीं सर्व आचारविचार सोडून दिले. तेव्हां अशा लोकांकडून आपल्या संततीस सामाजिक स्थिति, व्यवहार, धर्म, आचारविचारादिकांचें ज्ञान कसें प्राप्त होणार ? तेव्हां त्यांच्यासारखेंच किंवहुना त्यांच्याहून अधिक वाईट असें आचरण त्यांची संतति खास करणार. कारण कुटुंबांतील वडील माणसें जसें आचरण करतील तेंच आचरण मुलांबाळांस लागेल. जे लोक आपल्या धर्मास अनुसरून चालतात त्यांचें देखील मुलांस धर्मशिक्षण देण्याकडे दुर्लक्ष्य आहे; कारण मुलांस इतके विषय शाळेंत लाविले आहेत कीं, ते पाठ करण्यास त्यांना वेळ मिळत नाहीं. दुसरें मुलांचे पालकांस अशी आशा असते कीं, मुलगा शिकून जितके लवकर तयार होईल तितकें लौकर त्यास चाकरी मिळेल, ह्मणून धर्मशिक्षण देण्याकडे त्याचा काळ व्यर्थ घालवूं नये. वडील माणसांची ही अनास्था धर्मकर्म, आचारविचार लहानपणापासून सोडण्यास कारण होते. एक दोन परीक्षा पास झाल्यामुळें व चार पैसे मिळूं लागल्यामुळें मुलांची लहानपणापासून अंगांत खिळलेली स्वतंत्रता अधिक प्रबल होऊं लागते. जें धर्मविरुद्ध आचरण पूर्वीं चोरीनें करीत होते तें आचरण आतां उघड करूं लागतात. वडील, मातोश्री किंवा समाजांतील इतर संभावित गृहस्थ यांचा मान कसा राखावा व त्यांच्याशीं वर्तन कसें ठेवावें हें विद्याविभूषितांस कळत नाहीं व हवा तसा त्यांचा अनादर करितात. मुलगा वडिलांस संतोषित ठेवण्याचें सोडून देतो. ह्याचे उलट बापास मुलगा संतोषित राहील असें वर्तन ठेवावें लागतें. कारण त्यास ही भीति असते कीं, मुलानें कदाचित् काढून दिलें तर आपला चरितार्थ कसा चालेल ? ह्मणून सर्व प्रकारची अवहेलना सहन करून मुलाचे सूत्राप्रमाणें वागणें त्यास भाग पडतें. अशा प्रकारची विटंबना होणें परमेश्वराचा दंडच समजला पाहिजे. कारण, मुलांस धर्मशिक्षण देणें हें जें वडिलांचें मुख्य कर्तव्यकर्म त्यास ते विसरतात. आधुनिक विद्वानांपैकीं थोडकेच वडिलांस पूज्य मानणारे निघतील.

या स्वतंत्र वर्तनाच्या संवयीमुळें प्रथम व्यक्ति बिघडते, नंतर कुटुंबांतील लहानमोठ्या माणसांवर त्या व्यक्तीचा परिणाम प्रतिफलित होतो. यामुळें या देशाच्या सामाजिक स्थितीस अनुसरून दोघेचौघे बंधु एकोप्यानें राहणारे क्वचित् आढळतात. इंग्रज लोकांचें कुटुंब ह्मटलें ह्मणजे नवराबायको व त्यांचीं अर्भकें. कुटुंब शब्दाचा अर्थ, या देशांत इतकें संकुचित व्यापकत्व दाखवीत नाहीं. तर या देशचें कुटुंब ह्मटलें ह्मणजे आई, बाप, भाऊ, बहीण इत्यादिकांचा समूह होय. किंवा

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ॥
उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ॥

इंग्रजी सुशिक्षित, अशिक्षित, असे कीं, ज्यांस या देशाच्या कुटुंबांत किती सुख असतें याचा अनुभव नसल्यामुळें ते त्याच्या खऱ्या सुखास सर्वस्वीं मुकतात. प्रियता व ममता बायको व मुलें यांचेपर्यंतच परिच्छिन्न झालेली आहे. कोणी एकटाच असतो, कोणास दोघेचौघे बंधु असतात; तेव्हां यांत ईश्वराचा कांहींच उद्देश नसावा काय? त्यानें उद्देशावांचून जग व त्यांतील कोणताही पदार्थ उत्पन्न केला नाहीं. हें अनुभवसिद्ध आहे. ईश्वराचा जर असा उद्देश असता कीं, ज्यानेंत्यानें आपली बायकोच घेऊन रहावें, तर एखाद्याला एकच मुलगा व दुसऱ्या एखाद्यास दोघेचौघे मुलगे, अशी असमता दृष्टोत्पत्तीस आली नसती. बंधुबलासारखें दुसरें कोणतेंही बल नाहीं, हें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. तस्मात् जो एकटाच आहे त्यापेक्षां ज्यास दोघेचौघे बंधु आहेत त्यावर ईश्वराची तितकी अधिक प्रसन्नता समजली पाहिजे. कारण एकानें दुसऱ्यास मदत करावी व सुखानें काळ घालवावा ह्याकरितां ईश्वरानें हें त्यास स्वाभाविक साधन दिलें आहे. ह्या साधनाचा कोणी अव्हेर करून त्याच्या उद्देशाविरुद्ध वागतील त्यांवर तो प्रसन्न राहील किंवा अप्रसन्न राहील? सांप्रत (जनक) बाप यावरचेंच प्रेम शिथिल झालें आहे, तेव्हां भावांची कथा कोणीकडे? जे भाऊबंद तंटे करून विभक्त झाले आहेत त्यांची दाणादाण कशी झाली आहे ह्याचीं शेंकडों उदाहरणें प्रत्येक ठिकाणीं पाहण्यांत येतात. या देशाची कुटुंबरचना ईश्वरी उद्देशास अनुसरून असल्यामुळें त्यांत जें सुख व व्यावहारिक ज्ञान होण्यासारखें आहे तें सुख नवराबायकोचे कुटुंबांत होण्यासारखें नाहीं.

ईश्वराची भीति व त्यावरील विश्वास क्षीण झाल्यामुळें लहानथोर सर्वांचें वर्तन प्रमादाचें पाहण्यांत येतें. ह्मणजे सर्व आपापले धर्म विसरले आहेत. कुटुंबांतील वडील माणसांशीं कोणत्या प्रकारानें वागावें हेंच जर मुलांस कळत नाहीं तर ज्ञातींतील संभावित वृद्ध गृहस्थ भिक्षुकांशीं यथोक्त वर्तनाचें ज्ञान त्यांस कोठून होणार? इंग्रजी विद्येचा संसर्ग होतांच शाळेंत शिकत असलेल्या मुलास असें वाटूं लागतें कीं, हे वृद्ध लोक मूर्ख आहेत, आह्मी ह्मणतों हेंच रास्त आहे. तेव्हां जे एक दोन परीक्षा पसार झालेले आहेत त्यांच्या अभिमानाला तर सीमाच नाहीं. शिक्षण मिळत असलेल्या मुलांपासून तों परीक्षा पसार झालेल्या लोकांपावेतों हाच प्रकार पाहण्यांत येतो, व जणूं काय त्यांनीं वृद्ध मनुष्यांची फजीती करण्याचा विडाच उचलला आहे असें दिसतें. जो या कुत्सित कार्यांत विशेष कुशलता दाखवितो तो या सुशिक्षित झालेल्या मंडळींत अधिक संभावित गणला जातो. शिकत असलेलीं मुलें पुढें यांचेंच अनुकरण करितात.

सुशिक्षित लोकांचें वर्तन अतिशय स्वतंत्रतेचें होत आहे. तें न व्हावें ह्मणून सरकारानें शाळांतून नीतिशिक्षण सुरू केलें आहे. ह्यानें देखील लोकांचे डोळे उघडत नाहींत. सरकार प्रत्यक्ष सुचवीत आहे कीं, हिंदु लोकांचें नीतिशिक्षण पूर्वी चांगलें होतें व आतां फार वाईट झालें आहे. परंतु यावर एक तरी आधुनिक विद्वान् सुधारक लक्ष पुरवीत आहे काय? नाहीं. ह्मणून शाळांतून चालचलणुकीचें रजिष्टर चालू ठेवण्यास हुकूम दिला. मुलांची चालचलणूक चांगली किंवा वाईट होण्याचा जो काळ तो ह्या रजिष्टरांत नमूद होईल व त्या काळीं मुलांची चालचलणूक जी असेल ती खरी असें मुलें शाळांतून निघाल्यावर समजली जाणार. ह्यापासून कितीसें नीतिशिक्षण मिळणार हें उघडच आहे. यापासून परिणाम मात्र शोचनीय होणार. ज्या देशाच्या नीतिशिक्षणाबद्दल इतर देशांचे उत्तम विद्वान् प्रशंसा करितात, त्यांना नीतिशिक्षण घेण्याची पाळी आली आहे याची आह्मांस तिळमात्र लाज वाटत नाहीं.

आमचें नीतिशिक्षण पूर्वी उत्तम प्रतीचें होतें ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. परंतु आतां तें इतकें बिघडलें आहे कीं, सरकारास त्याची काळजी घेणें भाग पडलें आहे. परंतु आमचे लोक तें बिघडण्याचें कारण शोधून, तें दूर करण्यास धजत नाहींत. आमची सामाजिक स्थिति धर्मावर अवलंबून आहे. व अर्थ, काम, मोक्ष ह्यांची वाट दाखविणारी आहे. या चार पुरुषार्थांस हितावह व साधनभूत होणारीं धर्मकर्म, आचारविचार, वगैरे व्यक्तिमात्रास लावून दिलीं आहेत व त्यांचें योग्य प्रतिपालन करणें हें प्रत्ये-

काचें कर्तव्य आहे. पूर्वी उत्तम प्रकारचें शिक्षण पदोपदीं मिळत असे ह्मणून कोणी एकाएकीं कुमार्गाकडे वळूं शकत नव्हते. जगांत येऊन मनुष्याचें कर्तव्य कोणतें हें ज्या मार्गदर्शक श्रुतिस्मृतिविधिनिषेधशास्त्रापासून होणार त्यांवर अनास्था झाल्यामुळें धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांची इच्छा कोणास राहिली नाहीं, तेव्हां अर्थातच पुरुषार्थावर अवलंबित असलेली सामाजिक स्थिति चांगली वाढावी कशी ? व्यक्तीपासून कुटुंब व कुटुंबापासून समाज बनतो. अनेक समाज मिळून देश होतो. व्यक्तिमात्रांत जो ईश्वरांश आहे त्यास अनुसरून व त्या ईश्वराच्या आज्ञेप्रमाणें आमच्या पूर्वजांनीं व्यक्तिमात्राच्या सुधारणेकरितां असे नियम बांधून टाकिले आहेत कीं, त्यांचें यथायोग्य प्रतिपालन केल्यास नानाप्रकारचे जातींचे लोक मोठ्या स्नेहभावानें राहून शरीराचें संरक्षण उत्तमप्रकारें करून ऐहिक व पारमार्थिक सुख प्राप्त करूं शकतील, या गोष्टीचा निर्णय वर केलाच आहे. सांप्रत समाजरूपी वृक्षाची व्यक्तिरूप जडच नासली, तेव्हां त्या वृक्षास टवटवी राहणार कोठून ? मग पूर्वजांच्या इच्छेप्रमाणें त्यापासून फल तरी कोठून प्राप्त होणार ? या देशांत नीतिशिक्षण श्रेष्ठ प्रतीचें होतें यास आधार या देशाची सामाजिक स्थिति होय. जसजशी ही सामाजिक स्थिति क्षीण होत चालली, तसतसें नीतिशिक्षणही कमी कमी होत चाललें. ही गोष्ट विचारांतीं सहज लक्षांत येण्याजोगी आहे. मूळ वाळल्यावर वृक्ष जसा शुष्क होऊन कांहीं कालपावेतों उभा असतो तद्वत् या देशाची समाजस्थिति झाली आहे. या समाजरूपी शुष्क वृक्षास सजीव करण्याचा प्रयत्न सोडून देऊन त्यास इंग्रजी विद्यारूपी कुऱ्हाडीनें कापून पाडण्याची खटपट चालवून त्याची हवी तशी विटंबना करीत आहेत. वृक्षाच्या ज्या डाहळीवर मनुष्य बसला आहे त्या डाहळीस कापल्यानें जो अनर्थ होणार तोच अनर्थ सध्या चालू असलेल्या सुधारणेच्या प्रयत्नापासून होणार. हें कोणासही उमगत नाहीं ! केवढें आश्चर्य ! !

शाळेंत कोणत्या प्रकारचें नीतिशिक्षण मिळतें व त्यापासून आमच्या मुलांस कितपत लाभ होतो हें वर निर्दिष्ट केलेंच आहे. ईश्वरानें मनुष्यास बुद्धि दिली आहे. व त्या बुद्धीस सन्मार्गाकडे लावण्याकरितां ईश्वराज्ञेप्रमाणें आमच्या पूर्वजांनीं विधिनिषेधशास्त्रेंही बांधून ठेविलीं आहेत. त्यांचा आह्मांस कांहींच उपयोग नाहीं काय ? त्यांचा उपयोग सांप्रत चालू असलेल्या कुमार्गास उत्तेजन देणारा अर्थ त्यांतून काढून घेण्याकडे होत आहे. शास्त्रकारांचा उद्देश कोणता होता याकडे थोडें तरी लक्ष पुरवावें ! आमचा शहाणपणा आह्मांसच शोभतो, इतर देशवासी सखेदाश्चर्यानें चकित होतात.

प्राणिमात्राची स्थिति ईश्वरांशावर आहे. सत्वरजतमविशिष्ट बुद्धीच्या योग्यतेनुरूप चार वर्ण उत्पन्न झाले व तदनुसार प्रत्येक वर्णाचीं कर्मेंही नियमित झालीं. वर सांगितलेंच आहे कीं, या मार्गास अनुसरून चालण्यांत श्रेय आहे; व ऐहिक व परमार्थिक सुख त्या एका कर्तव्यावरच सदोदित लक्ष असल्यानें प्राप्त होतें. परंतु सुधारक ह्मणविणारांसही देखील शुद्ध नाहीं कीं, आह्मी देशाची सुधारणा करतों किंवा त्याचा सर्वस्वीं नाश करितों. सोन्याचीं नानाप्रकारचीं आभूषणें बनतात ह्मणून का सोन्यांत भिन्नता होते ? सर्व दागिन्यांचें तत्व सुवर्णच होय. किंवा पाण्याचा रंग व स्वाद भिन्न असला ह्मणून त्यास पाणी ह्मणूं नये काय ? तद्वतच या देशांतील भिन्न भिन्न जाति व त्यांचें भिन्न भिन्न आचरण या सर्वांचें तत्व एकच आहे. उत्तम, मध्यम, कनिष्ठ हे भेद जर निर्जीव पदार्थांत आहेत तर सजीव पदार्थांत हे भेद असलेच पाहिजेत. उत्तम, मध्यम, कनिष्ठ या तिन्ही प्रतींच्या सुवर्णास आह्मी सुवर्णच ह्मणतों ह्मणून उत्तम प्रतीच्या सोन्याची किंमत कनिष्ठ प्रतीच्या सोन्यास देणार नाहीं, तर ज्या तत्वाच्या योगानें तो पदार्थ सुवर्ण ह्मणवितो तें तत्व शुद्धता अशुद्धता भेदेंकरून उत्तम, मध्यम, कनिष्ठ ह्मणविण्याचा प्रघात व्यवहारांत पडला आहे. व तो सर्वांस मान्य आहे. याचप्रकारचा भेद पशुपक्ष्यांतही आढळतो. उत्तम, मध्यम, कनिष्ठ हे भेद जड पदार्थांत व पशुपक्ष्यांत जर कोणी मानणार नाहीं तर मनुष्यमात्र सर्व एकाच योग्यतेचे मानणें भाग पडेल. जड पदार्थांत व पशुपक्ष्यांत भेद मानून मनुष्यवर्गांत हा भेद न मानणें हें एका प्रकारच्या लोकांचे नियम सर्वांस लागू करण्याचा प्रयत्न करणें होय. त्यावरून मनुष्यास दिलेल्या बुद्धीची

योग्यता दिसून येते. इंग्रेजी शिकलेल्या पुरुषांत स्वतंत्रता शिरली व तिचें प्रतिबिंब व त्यांच्या बायकांवर व मुलांमुलींवरही पडलें. बायकांस स्वधर्मानें वागविणें पुरुषांचे स्वाधीन आहे, परंतु पुरुषच जर आपलें कर्तव्य विसरले तर मग ते बायकांस धर्मशिक्षण कोठून देणार ? पति आपल्या वडिलांची जशी अवहेलना करतात तशी त्यांच्या स्त्रियाही करूं लागतात. सासू किंवा सासऱ्यानें एखादी गोष्ट रीतीची सांगितली तर ती त्यांस रुचत नाहीं, व लावालावी करून पुरुषांचीं मनें अधिक कलुषित करतात. हेंच शिक्षण लहान मुलींस व मुलांस मिळतें. मुलींचीं लग्नें होऊन त्या शहाण्या झाल्या ह्मणजे त्याही अशा प्रकारचें वर्तन सासरीं करूं लागतात. माहेरीं गाऱ्हाणीं आणतात, यामुळें कधीं कधीं वैमनस्य पडतें. तस्मात् धर्मनाश जाहाल्यामुळें स्त्री पुरुष, मुलें मुली, सर्व आपापलें कर्तव्यकर्म विसरतात. देशाची दुर्दशा होण्याचें मूळ हेंच आहे. परंतु तिकडे कोणाचेंही लक्ष जात नाहीं.

इंग्रजी विद्येचा प्रसार होण्यापूर्वी निदान ब्राह्मण ज्ञातीच्या कुटुंबांत असा प्रबंध उत्तम असे कीं, त्यापासून सर्वांस सारखें सुख मिळत असे, व त्या प्रबंधापासून व्यावहारिक व धर्मसंबंधी शिक्षण सहज मिळत असे. त्या वेळीं स्वार्थबुद्धि क्वचितच दिसून येत असे. जो कमविणारा असे तो आपल्या स्वतःचा हक्क मुळींच लागू करूं शकत नसे. जें त्यास मिळतें तें सर्वांचे प्रारब्धानें मिळतें असा दृढ समज होता ह्मणून कमविणाऱ्याच्या मनांत स्वार्थबुद्धि प्रवेश करूं शकत नव्हती. एखाद्या वडील माणसानें प्रबंध करावा व त्याचा दर्प लहान मुलापासून तों समंजस मनुष्यापर्यंत सारखा राहत असे, यामुळें कुटुंबांत ऐक्य राहून प्रत्येकास आपापल्या कर्तव्याचा बोध होत असे. जसजशी स्वार्थबुद्धि मनुष्यांत वाढत आहे तसतशी आईबापांवरची पूज्यबुद्धि क्षीण होत जात आहे. असें जर होत आहे तर भाऊबंदांशीं कितीसें प्रेम राहणार ? सध्यां भाऊबंद एकत्र राहणेंच कठीण. राहिलेच तर स्वतंत्रतेनें वागतात, यामुळें एकत्र राहण्याचें काय सुख आहे याचा अनुभव त्यांस मुळींच येत नाहीं. सांप्रत स्वार्थबुद्धि पूर्ण स्थितीस पोंहचली आहे असें वाटतें. प्रत्येकास हा अभिमान आहे कीं, जें मला मिळतें त्यावर माझा व माझ्या बायकोपोरांखेरीज कोणाचाही हक्क नाहीं. भाऊबंदांस देणें न देणें हें माझ्या इच्छेवर आहे. प्रत्येकाचे कमाईत कुटुंबांतील सर्व माणसांचा सारखा हक्क आहे हें जाणून तदनुसार वर्तन करणारा आजकाल विरळाच. किती ही उन्नती ! ! ! वडील माणसांची भीति मुळींच राहिली नाहीं. त्यांचा एखाद्या कामांत सल्ला घेणें ह्मणजे मोठें लांछन आहे असें वाटूं लागलें आहे. त्यांनीं नातवंडांना हूं ह्मटलें कीं, मुलास व सुनेस खपत नाहीं, तेव्हां शारीरिक शिक्षा देणें तर दूरच. कोठें कोठें वडील माणसांची अशी विटंबना पाहून फार खेद होतो. त्यांनीं मुलांस लहानपणापासून त्यांचें कर्तव्य शिकविलें नाहीं ह्मणून ईश्वरही त्यांची अशी विटंबना करवितो. जे लोक वडिलांच्या ठिकाणीं अशा प्रकारची श्रद्धा ठेवीत असतील त्यांस ईश्वराजवळ जबाब देऊन योग्य दंड भोगावा लागेल. ईश्वर अदृश्य आहे, परंतु मातापितरें यांच्या रूपानें तो दृश्य आहे. यांची जो तनमनधनेंकरून सेवा करील तो त्या अदृश्य ईश्वरास प्रसन्न करून घेईल.

---

## भाग ५.

### पुनर्जन्म व प्रारब्ध.

**न सांपरायः प्रतिभाति बालं प्रमाद्यंतं वित्तमोहेन मूढं ॥**
**अयं लोको नास्ति पर इति मानी पुनः पुनर्वशमापद्यते मे ॥ १ ॥** कठोपनिषत्.

या भागांत पुनर्जन्म व प्रारब्ध या संबंधानें विचार करूं. पुनर्जन्म नाहीं व प्रारब्धही कांहीं नाहीं असा कित्येकांचा समज झाला आहे. परंतु हा समज भ्रांतिमूलक आहे असें सदरील श्रुतीवरून स्पष्ट होत आहे. ह्मणून ही भ्रांति दूर करून पोटभर अन्न व आंगभर वस्त्र उत्पन्न करण्यावांचून मनुष्याचें या संसारांत

जें एक महत्वाचें कर्तव्य आहे त्याचें स्मरण ठेवणें प्रत्येक समंजस मनुष्यास अवश्य आहे. याकरितांच मनुष्यास बुद्धीची महद्देणगी ईश्वराकडून मिळाली आहे. व बुद्धीस मार्ग दाखविण्यास विधिनिषेधशास्त्रें बांधलीं आहेत. आणि कर्तव्यास पोंचण्याकरितां वेद आहेत. धान्य उत्पन्न करण्याकरितां जमीन चांगली तयार करावी लागते, तद्वतच स्वधर्माचरणरूपी नांगरानें मनरूपी जमीन तयार करावी. जमीन चांगली तयार झाल्यावर पीक चांगलें उत्पन्न झालेंच पाहिजे. तसेंच विषयासक्ति व स्वधर्मतिरस्काररूपी मळानें अगदीं निरुपयोगी झालेलें मन स्वधर्माच्या श्रद्धेनें सदाचरणाकडे लाविलें ह्मणजे प्रत्येक आचारविचाराचा उद्देश ज्ञानरूपी फलाचे द्वारें लक्षांत येईल. अन्न लागलीच उत्पन्न होत नाहीं ह्मणून कोणी त्याचें पेरणें सोडून देतो काय ? पुढच्या आशेवर अतोनात श्रम करितो, तेव्हां शेवटीं त्यास त्याच्या परिश्रमाचें फल प्राप्त होतें. जो संबंध जमीन, नांगर व वीं ह्यांचा आहे तोच संबंध मन, स्वधर्माचरण व आचारविचार ह्यांचा आहे. ह्मणून त्यांच्या योग्य परिपालनानें योग्य फल प्राप्त झालेंच पाहिजे. परंतु ही गोष्ट आधुनिक विद्वान् कबूल करीत नाहींत ह्मणून पंचमहायज्ञ जें ब्राह्मणाचें मुख्य नित्यकर्म त्यास ते तिलांजली देऊन बसतात, इतकेंच नव्हे, तर इंग्रजी विद्येंत निष्णात झालेल्यांपैकीं कोणी स्वधर्माचरणानें वागत असला तर त्याला वेडा व पढतमूर्ख असें समजून त्याची निर्भर्त्सना करितात. कसा विपरीत काळ आला आहे तो पहा कीं, स्वधर्मत्यागी प्रशंसेस व पालक निंदेस पात्र होतो. ज्या विद्येचा असा परिणाम होतो तिला विद्या हें नांव देखील शोभत नाहीं. "विद्या" हा शब्द "विद्" धातूपासून निघाला आहे, त्याचा अर्थ स्वतःचीं तत्वें ओळखणें असा आहे. इंग्रजी विद्येनें जर हिंदुस्थानचे लोक आपलें आर्यत्व विसरले तर तिला विद्या हें नांव कसें बरें शोभेल ?

ईश्वरास सर्व प्राणी सारखे असून असमता पाहण्यांत येते. कोणी श्रीमान, कोणी दरिद्री, कोणी धष्टपुष्ट, कोणी दुर्बळ, लंगडे, आंधळे, बहिरे अशा प्रकारचे प्रत्येक ठिकाणीं लोक पाहण्यांत येतात. ईश्वर जर सर्वांचा सारखा स्वामी आहे तर त्याच्या इच्छेनें ही असमता होत आहे असें मानल्यास त्या ईश्वरावर निर्घृणता व पक्षपात यांचा आरोप येईल. परंतु हे दोष कदापि त्यास लागूं शकत नाहींत. तर मग या असमतेचें कारण काय असावें ? याकडे कोणाचें तरी लक्ष पोंहचत आहे काय ? जर जग इतकेंच आहे व पोटांतून निघाल्यापासून तों देहपातापर्यंतच सर्व आटपतें तर ही असमता कां पाहण्यांत येते ? ह्यावरून ईश्वर काय सुचवीत आहे याबद्दलचा विचार सर्वांनींच सोडून दिला आहे. मानवी प्रयत्नाधीनच ही असमता होऊं शकेल काय ? दोघे पुरुष सारख्या योग्यतेचे प्रयत्नानें झाले असून एकास मोठा अधिकार मिळतो व दुसरा त्या पदवीस जन्मभर प्रयत्न करूनही पोंहचत नाहीं ह्याचीं हजारों उदाहरणें देतां येतील. व प्रत्येकास पदोपदीं अनुभवही येत आहे, परंतु तिकडे लक्ष देतो कोण ? प्राणिमात्रास सुख, दुःख लागलें आहे, यांत कांहीं तरी गुह्य असलेंच पाहिजे. बीज असेल तर अंकुर फुटून पुढें फळ येईल. बीजच नाहीं तर बीज व अंकुराची आशा कोठें. तद्वत् या देहरूपी अंकुरास व त्यास लागणाऱ्या फळास (सुखदुःखास) उत्पन्न करणारें कांहीं तरी एखादें बीज असलें पाहिजे. ह्मणून उत्पत्तीपूर्वी ह्मणजे जन्मापूर्वी प्रत्येक प्राण्याचा जन्म होता हें कबूल केल्यावांचून गतीच नाहीं. त्या जन्मांत जसें धर्माधर्माचें आचरण केलें असेल तदनुसार प्रत्येक मनुष्यास सुख किंवा दुःख या जन्मीं प्राप्त होतें, व या जन्माच्या धर्माधर्माचें फळ पुढच्या जन्मीं मिळेल यासच प्रारब्धसंज्ञा आहे, यास मानवी प्रयत्न टाळूं शकत नाहीं. तें भोगणेंच भाग पडतें. धर्मानुसार प्रयत्न केला असतां पुढच्या जन्मींचें प्रारब्ध सुधारतें व धर्मविरुद्ध आचरण केल्यास या जन्मीं जें सुख वाटत आहे त्याच्या दसपट विपत्ति पुढील जन्मीं भोगावी लागते. वृद्धावस्थेकरितां संपत्ति मिळविण्यांत सर्वांचें चित्त वेधलें आहे. परंतु त्या वृद्धावस्थेच्या पुढच्या प्रारब्धाची कोणी काळजी घेत नाहीं. ईश्वराच्या अस्तित्वाचा बहुतेकांस विश्वास नाहीं, तेव्हां लोक त्याची भीति बाळगतात कशास ? ईश्वर आहे असा ज्यांचा विश्वास आहे त्यांस स्वधर्माचें ज्ञान नसल्यामुळें ते क्रिया मात्र करून आहेत.

एकंदर अधर्माचरण होऊं लागलें आहे. या देशाची विपत्ति वाढण्याचें कारण हेंच आहे. न्यायाधीश जसा स्वेच्छेनें दंड देऊं शकत नाहीं, तद्वतच ईश्वर स्वेच्छेनें मनुष्यास सुखदुःख भोगण्यास लावीत नाहीं. कायद्याअन्वयें जसा अपराध ठरेल तसा त्या आरोपीस दंड मिळेल. अपराधी, कायदा व न्यायाधीश यांचा जसा संबंध आहे तद्वतच जीव, ईश्वर यांचा संबंध आहे. कायद्याविरुद्ध आचरण केलें असतां राजा दंड देतो. धर्मविरुद्ध आचरण केलें ह्मणजे ईश्वर दंड करतो. राजदंड कांहीं दिवस, महिने वर्षांपर्यंत भोगावा लागतो; परंतु धर्मविरुद्ध आचरणानें ईश्वराचा दंड जन्मभर भोगावा लागतो. ह्या शिक्षेची कोणी तरी भीति वाळगतो काय. राजदंडाची भीति मुलें सुद्धां वाळगतात. तर सर्वशक्तिमान परमेश्वरावर पूर्ण विश्वास ठेवा. स्वधर्माचें संरक्षण करण्याची काळजी वाळगा. धर्मसंरक्षण झाल्यावांचून या देशाची स्थिति सुधारावयाची नाहीं, दिवसेंदिवस विघडतच जाईल. सुशिक्षित लोकांस मोठमोठ्या अधिकाराच्या जागा मिळाल्या ह्मणून ह्मणा किंवा अशा लोकांपैकीं वहुतेकांनीं वकीली, वारिस्टरी, डाक्टरीचे धंदे करून अतोनात पैसा मिळविला ह्मणून ह्मणा, देशाची ऊर्जित दशा होत आहे असें कित्येक समजणारे समजत आहेत; पण ह्या समज अगदीं असमंजसतेचा आहे. असे लोक हिंदुस्थानच्या प्रजेच्या शतांशही नसतील. अशांचें हें सुधारक मंडल वनलें आहे. आणि यांचा असा समज आहे कीं जसे आह्मी सुखी आहों तसे सर्व लोक सुखी आहेत. जें आह्मांस हितावह होईल तें सर्व प्रजेस हितावह आहे. असें गृहीत धरून सर्व हिंदु प्रजेचे प्रतिनिधि वनून प्रजेची विपत्ति वाढविणारी सुधारणा करीत आहेत. हजारों रुपये खर्च करून राष्ट्रीय सभेचे समारंभ प्रतिवर्षीं होत आहेत. परंतु ज्या प्रजेपासून हा पैसा मिळतो त्या दीन झालेल्या प्रजेची कोणास कळकळ आहे काय? हजारों लोक उपासमार काढीत आहेत. हजारों एक वेळ खाऊन दिवस कंठीत आहेत. यांची दया सुधारकांस येत आहे काय? धर्म जसजसा क्षीण होत आहे तसतसें दारिद्र्य अधिकाधिक वाढत आहे. हें प्रत्यक्ष अनुभवास येत असूनही कोणाचा धर्मावर विश्वास वसत नाहीं. आह्मी स्वेच्छेनें जें करितों तोच धर्म असें समजतात. केवढी ही वुद्धीची थोरवी !!!

---

## भाग ६.

## वालविवाह, स्त्रीशिक्षण व स्वातंत्र्य इत्यादि.

**अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयं धीराः पंडितंमन्यमानाः ॥**
**दंद्रम्यमानाः परियंति मूढा अंधेनैव नीयमाना यथांधाः ॥**

प्राचीनकाळीं लग्न करण्याचा मुख्य उद्देश गृहस्थाश्रमाचें यथोक्त परिपालन घडण्यांत असे. व त्याकरितां आवश्यक असे नियमही करून ठेविले. परंतु आतां त्या नियमांची वतावणी मात्र होते. कारण हल्लीं धर्म ह्मणजे काय हेंही कळेनासें झालें आहे, मग त्याचें योग्य पालन तरी कसें व्हावें? सांप्रत लग्नाचा उद्देश असा समजतात कीं वैषयिक सुख प्राप्त होऊन संतति उत्पन्न व्हावी. व हीच खटपट जारीनें चालू आहे. परंतु वैषयिक सुखापासून एक महत्वाचा बोध होतो त्याकडे कोणाचेंच लक्ष पोंचत नाहीं. रतिसंभोगकाळीं सुख कां वाटतें? त्या सुखांत मनाची इतकी संलग्नता होते कीं त्या वेळीं उभयतांस देहभानही राहात नाहीं. केवढें आश्चर्य कीं या क्षणिक सुखाकरितां मनुष्य किती लंपट होऊन जातो. परंतु तें तरी त्या क्षणावांचून प्राप्त होतें काय? यावरून हें सिद्ध झालें कीं, ज्या क्षणीं **मी तो** असें द्वैत भासत नाहीं, त्यांत खरोखर मोठें सुख व आनंद आहे. व त्यावद्दल वासना प्रत्येक प्राण्यास आहे. वैषयिक भोगांत क्षणमात्राकरितां द्वैतभावाचा ऱ्हास होऊन जर एवढें मोठें सुख क्षणांत प्राप्त होतें तर ज्या ईश्वरांशाच्या वलानें हा मानव हें वैषयिक सुख भोगण्यास समर्थ होतो त्या सर्व सुखाचें मूळ जो हा ईश्वरांश, त्याकडे मन लावलें असतां किती वरें सुख होणार याची कल्पना देखील होत नाहीं. वैषयिक सुख क्षणिक असून साधनापेक्ष्य आहे

व तें त्या क्षणावांचून मिळत नाहीं. परंतु या ईश्वरांशाची मनास ओळख झालीअसतां द्वैतभाव नाश पावतो व अक्षय सुखाचा आस्वाद साधनावांचून सदोदित मिळूं लागतो. क्षणिक असणाऱ्या वैषयिक सुखाकरितां सर्व आयुष्य घालवावें आणि त्यापासून ज्या अक्षय्य सुखाची ओळख होते त्याविषयीं मनुष्यानें आपले बुद्धीचा कांहींच उपयोग करूं नये काय ? तेव्हां पशुपक्षी व मनुष्य ह्यांत भेद तो कोणता? ठीकच आहे कीं, मनुष्याची योग्यता त्याच्यापेक्षांही खालच्या पदवीची मानावी. कारण पशुपक्षी आपापल्या ऋतूंत रतिसुखाचा उपभोग घेतात व मनुष्यें हवा तेव्हां हवा तसा घेतात. किती हें बुद्धीचें नीचत्व !

पतीवर पूर्ण श्रद्धा ठेवून त्यांच्या सेवेंत सदोदित रहावें हाच मार्ग स्त्रियांस मोक्षप्राप्ति करून देणारा आहे, परंतु सांप्रत पुरुषच जर धर्मविरुद्ध आचरण करितात तर त्यांचेठायीं स्त्रियांची श्रद्धा कोठून बसेल ? पूर्वीं ज्या गुणांनीं स्त्री साध्वी मानत असत ते गुण आतां आधुनिक विद्वानांच्या दृष्टीनें मूर्खपणाचे ठरले आहेत व त्यांस असें शिक्षण मिळतें कीं त्या स्वार्थ व परमार्थ या दोहोंस मुकतात. धन्य आधुनिक विद्वानांची कीं स्वतः धर्मभ्रष्ट होऊन स्त्रियांसही अधर्मास लावतात! असा काळ जरि आला आहे तरी स्त्रिया बहुधा आपला धर्म बाळगून आहेत. स्त्रियांत पुरुषाप्रमाणें विद्येचा प्रसार झाला असता तर जी शोचनीय स्थिति आज पुरुषांची आहे तीच त्यांची झाली असती. व इतर देशांच्या सुधारलेल्या समाजाप्रमाणें बायकापुरुषांचीं भांडणें नेहमीं पाहण्यांत येतीं. पूर्वनियमानुसार सामाजिक स्थिति न सुधारली तर कदाचित् कालेंकरून असे प्रसंग घडण्याचा संभव आहे. याचें उदाहरण मुंबईस घडून आलेंच आहे.

सांप्रत मुलींस शाळांतून देशी भाषा शिकवितात. जे विषय मुलांस शिकवितात तेच विषय मुलींसही शिकवितात. जितका वेळ मुलांस शाळेंत घालवावा लागतो तितकाच वेळ लहान लहान मुलींसही घालवावा लागतो. ह्यावरून मुलें व मुली हीं सारख्याच शक्तीचीं मानलीं गेलीं, परंतु यापासून शारीरिक व मानसिक शक्तीवर कसे विपरीत परिणाम घडतात इकडे कोणी तरी लक्ष देतो काय ? दुसरें, जीं पुस्तकें शिकवितात तीं कांहीं इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें व कांहीं त्यांच्या आचारविचारांच्या धाटणीवर रचलेलीं. ह्यानें इतर कांहींएक उपयोग न होतां मात्र लहानपणापासून मुलींस इंग्रजी व्यवहाराचें ज्ञान होतें. हें ज्ञान जसजसें होत जातें तसतसें त्यांच्यांतही स्वतंत्रतेचें वारें शिरतें. जो काळ शाळेंत घालविला, तो त्यांनीं घरीं घालविला असता तर त्यांस उपयोगी पडणारें प्रापंचिक ज्ञान तरी प्राप्त झालें असतें. मुलींस प्रापंचिक ज्ञानाची विशेष आवश्यकता आहे, कारण त्यांचें आयुष्य परक्याचे घरीं जाणार. ह्यावरून स्त्रीशिक्षण या देशांत प्रचलित होऊन अद्याप ह्मणण्यासारखें श्रेय आलें नाहीं. व पुढेंही येण्याची उमेद नाहीं. सामाजिक स्थितीनें अगदीं विरुद्ध दिशाच घेतली तर मात्र स्त्रीशिक्षणाचा अधिक प्रसार होईल. अद्याप आधुनिक विद्वानांवांचून कोणीही स्त्रीशिक्षण पसंत करीत नाहींत. करितां विद्वान् सुधारकांनीं ह्या स्त्रीशिक्षणाचे परिणाम चांगले विचार करून पाहिले असतां त्यांस हें उघड दिसून येईल कीं आह्मी सामाजिक स्थितीच्या अगदीं विरुद्ध आहों. स्त्रियांस शिक्षण देणें झाल्यास प्राचीन कालच्या स्त्रियांचीं चरित्रें व स्वल्प पौराणिक कथा त्यांस शिकवाव्या; यांच्याद्वारें त्यांस धर्मनीति, व व्यावहारिक ज्ञान सहज प्राप्त होईल.

स्त्रियांस जन्मभर दुसऱ्याचे घरीं रहावें लागतें ह्मणून त्यांनीं लहानपणापासून त्या कुटुंबांतील माणसांचे स्वभाव ओळखावे, त्यांस रुचेल असें वर्तन ठेवावें, आपला स्वभाव त्यांचे स्वभावांशीं जुळेल असा कित्ता गिरवावा. नाहीं तर तिची वेळोवेळीं विटंबना होऊन जन्मभर दुःख भोगावें लागेल. हें संकट मुलीवर येऊं नये ह्मणून या देशांत बालविवाह चालू केला. पूर्वकालीं मुलांचीं लग्नें मात्र १८।२० वर्षांखालीं होत नसत, परंतु तीं आतां १०।१२ वर्षांच्या मुलांचीं होऊं लागलीं. बालविवाह बंद करणें सामाजिक स्थितीस अपायकारक असून शास्त्रविरुद्धही आहे. तेव्हां त्याचा नाद सोडून मुलांचीं लग्नें १८ वर्षांखालीं करूंच नये, असा सर्वांनीं निश्चय करावा. कन्सेंट बिलाप्रमाणें बालविवाह बंद करण्याचा प्रयत्न सुधारक मंडळीनें करूं नये. याचे परिणामावर चांगला विचार (वेदशास्त्ररीत्या) करावा ह्मणजे गुणदोष लक्षांत येतील.

स्त्रियांस पति हाच ईश्वर आहे अशी आमचे धर्माची आज्ञा आहे. ईश्वर जर एकच आहे तर स्त्रियांस पतीही एकच असला पाहिजे. तिच्या प्रारब्धानें तो जिवंत राहिला तर तिला ऐहिक व पारमार्थिक दोन्ही सुखें मिळतील. मृत झाला तर ऐहिक दुःख प्रारब्धानुसार भोगून त्या पतीच्या चिंतनांत तिनें आयुष्याचे दिवस घालवावे व शरीररक्षण होईल इतकेंच भक्षणादिक करावें. पुरुषास जसा चतुर्थाश्रम तसें स्त्रियांस वैधव्य-षड्रिपुदमन दोघांसही सारखेंच आहे. औरस पुत्र उत्पन्न करणें गृहस्थाचा धर्म असे. पुत्र होण्यापूर्वी जर बायको मेली तर त्यास दुसरें लग्न करण्याचा अधिकार आहे. पुत्र असून दुसरें लग्न करणें धर्माविरुद्ध आहे. ज्या कालीं ब्राह्मण आपलें ब्राह्मणत्व राखून होते ह्मणजे वैषयिक सुखास तुच्छ मानीत होते व सर्व लक्ष मोक्षप्राप्तीकडे लावित होते, त्या कालच्या सामाजिक स्थित्यनुसार हे सर्व नियम बांधले गेले. हल्लीं अधर्मप्रवृत्ति झाल्यामुळें ब्राह्मणांचें ब्राह्मणत्व गेलें व वैषयिक सुखाची त्यांना गोडी लागली. ह्यामुळें त्या सुखास हितावह अशा सुधारणा करण्याची आवश्यकता प्राप्त झाली. परमार्थ ह्मणून काय पदार्थ आहे ही गोष्ट त्यांच्या ध्यानींमनीं देखील नाहीं. विधवा अनाचार करितात व तो होऊं नये ह्मणून विधवाविवाह सुरू केले. परंतु पूर्वी विधवाविवाह कोणत्या कारणानें बंद पडले व आतां त्या गोष्टीची आवश्यकता कोणत्या कारणामुळें पडूं लागली, हा विचार कोणीही करीत नाहीं. अशास्त्र काम करून आह्मी सशास्त्र काम करीत आहों अशी घमेंड मारितात. ब्रह्मकर्माची जुळवणी अशी करून ठेविली आहे कीं, ब्राह्मणास बाळपणापासून परमार्थसाधनाची संवय लागावी. परंतु इंग्रजी विद्येनें इतकें सोज्वल ज्ञान होऊन जातें कीं खाणेंपिणें याशिवाय जगांत सर्व गोष्टी गौण आहेत असें वाटतें. पूर्वी स्त्रियांस पति हेंच दैवत असे, तो काळ चांगला होता किंवा त्यांना दुसरा पति मिळावा ही इच्छा होत आहे तो काळ चांगला ? एका पदार्थावर मन बसल्यानें सुख होतें किंवा दुसऱ्या पदार्थाची अपेक्षा केल्यानें सुख होतें ? विधवाविवाह बंद ठेवून जें सुख इहलोकीं प्राप्त होतें तें चांगलें किंवा त्या विधवांचे विवाह सुरू केल्यानें त्यांना जें सुख प्राप्त होईल तें चांगलें ? विधवाविवाहास आरंभ केला असतां ऐहिक व पारमार्थिक दोन्हीही सुखें नाहींशीं होणार. याबद्दल सुधारक मंडळीनें चांगली पक्की गांठ बांधावी. वैषयिक सुखास उत्तेजन देणें ब्राह्मणधर्मास विरुद्ध आहे. इंग्रज लोक किंवा हिंदु नीच जातींत विधवाविवाह चालू आहेत ह्मणून ब्राह्मण जातींतही झाले पाहिजेत हा कोणता न्याय असेल तो असो. जर ब्राह्मण, इंग्रज व इतर नीच जाती हे सर्व एकाच वर्गातले मानिले तर हा न्याय कदाचित लागू पडेल. हे जर एक मानीत नाहींत तर ब्राह्मण इंग्रज वगैरे भिन्न भिन्न प्रकारचे आहेत व ज्या जातीचे नियम त्या जातीसच हितावह होतील. ब्राह्मणत्व तर गेलें परंतु आह्मी ब्राह्मण नाहीं असें जोंपर्यंत सुधारक ह्मणूं इच्छित नाहींत तोंपर्यंत या गोष्टी ते प्रचलित करूं शकत नाहींत.

---

## भाग ७.

### ब्राह्मणज्ञातीची सांप्रतची स्थिति.

**वा ! भोगणें पडतसे फल दुष्कृतीचें ॥ कांहीं न त्या पुढति चालतसे मतीचें ॥**
**दोषार्ह कोणिहि नसे निजवैभवाचे-॥ नाशार्थ; यास्तव नको शिणवूं सुवाचे ॥**

ब्राह्मणांनींच धर्मसंस्थापना केली, परंतु धर्मसंस्थापकांच्या सांप्रत संततीचा प्रयत्न धर्माचा उच्छेद करण्याचा आहे. ब्राह्मण विद्वद्रत्नांचीं आचरणें जितकीं धर्मविरुद्ध आहेत तितकीं इतर जातींत पाहण्यांत येत नाहींत. शुभ्र वस्त्र लौकर मलीन होतें, ह्मणून त्याची काळजी फार ठेवावी लागते, परंतु मलीन वस्त्रास पूर्वीचा मळ असल्यानें आणखी मळ लागला तरी दृष्टीस पडत नाहीं. ह्मणून त्याची काळजीही विशेष ठेवावी लागत नाहीं. तद्वत् ब्राह्मणज्ञाती पूर्वी शुभ्र वस्त्राप्रमाणें शुद्ध होती परंतु सांप्रत ब्राह्मणांची

स्थिति इतकी विघडली आहे कीं, वहुतेक आधुनिक विद्वानांस ब्राह्मणकुलांत उत्पन्न होण्यांत महत्व वाटेनासें झालें आहे. तेव्हां त्यांचेकडून स्वधर्म कोठून पाळला जाणार? अशा विद्वानांचे पोषाक, राहण्याची धाटणी पूर्वीप्रमाणेंच आहे, परंतु त्यांनीं स्वधर्मकर्म, आचारविचार ह्यांस तिलांजलि दिली आहे व ब्राह्मणांचा वेष धारण करून ते निःशंकपणें हाटेलांत भोजन करितात. देशाची सुधारणा यांतच आहे असें ते समजतात. किती ही मदोन्मत्तता!!! पूर्वजांनीं ज्यांच्याकरितां सर्व प्रकारचे नियम बांधून ठेविले आहेत ते या सर्व नियमांचें उल्लंघन करून आपली कृतघ्नता उघड करून दाखवीत आहेत. किती ही सुधारणा!!!

सांप्रत या समाजांत प्रत्येक ठिकाणीं चार प्रकारचे लोक पाहण्यांत येतात.—

(१) शास्त्री, पंडित, जे सर्व धर्माचा उद्देश समजून आचरण करितात असे पुरुष क्वचितच सांपडतात.

(२) धर्मकर्माची क्रिया मात्र करणारे जुने गृहस्थ व भिक्षुक यांची संख्या दिवसेंदिवस कमी कमी होत जात आहे.

(३) धर्मकर्म सर्व थोतांड मानणारे परंतु त्याचा नाममात्र अवलंब करणारे आधुनिक विद्वानांपैकीं वहुधा सर्व.

(४) धर्मकर्म, आचारविचार यांस तिलांजलि देऊन निःशंकपणें आचरण करणारे. पोषाकावरून व ब्राह्मणकुलांत उत्पन्न झाल्यामुळें ब्राह्मण ह्मणविणारे सर्वज्ञ.

(१) व (२) वर्गांतील संख्या दिवसेंदिवस कमी होऊन ब्राह्मणज्ञातीचा सर्व भरणा (३) व (४) वर्गांतच होतोसा दिसत आहे. समाजाचीं सूत्रें बहुधा (१) व (२) वर्गांतील लोकांच्या हातीं आहेत. परंतु शास्त्ररीत्या हीं सूत्रें चालविण्याचें वल त्यांच्यांत राहिलें नाहीं. धर्म, शास्त्रवेत्ते व यथोक्त आचरण करणारे पहिल्या वर्गांतील सत्पुरुष एक दोघेच असतात. याव्यतिरिक्त सर्वांची प्रवृत्ति धर्मनाशाकडेसच आहे. कोणाचेंही लक्ष धर्मसंरक्षणाकडे नाहीं. वेद शिकविणें गृहस्थ ह्मणविणारास लांछन वाटतें तेव्हां अर्थातच हे धर्मच्युत झाले. ब्राह्मणाचें जें मुख्य कर्तव्य तेंच करण्याची लज्जा वाटते, मग धर्म राहिला कोठें? मुख्य धर्मसंरक्षण ह्मणजे पोट भरणें. या धर्माचें पालन इंग्रजी शिकल्यानें होतें तेव्हां त्यांना मुलांस शाळेंत पाठविणें भाग पडतें. वेद जाणणारे भिक्षुक तेही स्वधर्माचा अभिमान वाळगून नाहींत. पोट भरण्याचें हें एक साधन समजून ते भिक्षुकवर्गांत आहेत. स्वधर्माचा अभिमान नसल्यामुळें हे लोक लोभाविष्ट झाले आहेत. यांचीं आचरणें शुद्ध नाहींत व मुलांस वेदाध्ययनाबद्दल इंग्रजी शिकवूं लागले, तेणेंकरून मुलांस संध्येची देखील मारामार पडूं लागली. अशा लोकांचा भरणा (२) वर्गांत असल्यामुळें (१) वर्गाचे एक दोघे सत्पुरुष असतात त्यांस या दुसऱ्या वर्गाच्या लोकांच्या तंत्रानें वागणें भाग पडतें. (३) वर्गाचे कांहीं लोक (३) वर्गाशीं मिळून असतात. अशा दोन फळ्या होतात. एका फळींत (५) व (२) वर्गाचे व कांहीं (३) वर्गाचे लोक व दुसऱ्या फळींत अवशेष ३ वर्ग व ४ वर्ग यांमध्यें प्रत्येक ठिकाणीं कलह चालू आहेत व धर्मसंरक्षणाची घमेंड मारून सर्व मिळून धर्माचा नाश करीत आहेत.

जो ब्राह्मणवर्ण पूर्वी सर्व वर्णांचा राजा होता व सर्वांचा मार्गदर्शक होता तो स्वधर्मापासून च्युत झाल्यामुळें त्यास त्याच्या स्वतःचा मार्ग दिसेनासा झाला आहे व आपसांत कलह माजवून एक दुसऱ्याची फजीती करण्यास प्रवृत्त आहे. पहिल्या फळीचे लोक दुसऱ्या फळीच्या लोकांची निंदा करितात. दुसरीचे पहिलीची निंदा करितात. पहिल्या फळीच्या लोकांचीं आचरणें कांहींशीं धर्मविरुद्ध असल्यामुळें यांचा समाजावर अगदीं दाव नाहीं. अधिकाऱ्याचें[१] वजन तर मुळींच नाहीं. त्यांचें कर्तव्य कोतवाल फेरणे व प्रायश्चित्त देण्यांतच आटपतें, असा या धर्माधिकाऱ्यांचा समज आहे. प्रबंध ह्मणून काय हें ते जाणतच नाहीं. ब्राह्मणांचीं जीं आवश्यक कर्तव्यकर्में तीं कोण करतो व कोण करीत नाहीं याचा कोणीही विचार

१ धर्माधिकाऱ्याचें.

करीत नाहीं. लोक हवें तसें आचरण करितात. धर्मोपदेश करणें अधिकाऱ्यांचें मुख्य कर्तव्य आहे, परंतु तेही त्यास विसरले. वहुधा लोकांचीं आचरणें स्वेच्छाचारी झालीं आहेत. विधि काय व निषेध काय याचा अर्थ स्वेच्छेवर अवलंवित आहे. ज्ञातींत प्रवंध नसल्यामुळें धर्म काय व तो कां पालन केला पाहिजे याचें ज्ञान होण्यास कोणतेंही साधन राहिलें नाहीं. भिक्षुकमंडळीनें पैशाकडे नजर दिल्यामुळें अधिकाऱ्यास हवें तसें वळवून प्रायश्चित्तें देववितात. ज्यास प्रायश्चित्त दिलें जातें त्यास त्याचा अर्थ ह्मणजे पश्चात्ताप होणें स्वप्नांत देखील कळावयास नको. अपराधी यानें पैसे दिले ह्मणजे त्यास प्रायश्चित्त मिळूं शकतें. मग तें सशास्त्र असो किंवा अशास्त्र असो. याची कोणासही गरज नाहीं. ज्या ठिकाणीं शास्त्राचा उपयोग झाला पाहिजे त्या ठिकाणीं द्वेष, स्वार्थबुद्धि व पक्षपात यांचा उपयोग होतो. या ब्राह्मणजातींत कोणत्याही प्रकारचा प्रवंध नसल्यामुळें लोक हवें तसें वर्तन करूं लागले व ज्ञातींत मिसळून संपूर्ण ज्ञातीची फजीती करूं लागले. हलकेंसलकें कार्य प्रवंधावांचून होऊं शकत नाहीं; तेव्हां एवढ्या मोठ्या ज्ञातीचें प्रवंधावांचून धर्मसंरक्षण होणें अगदीं अशक्य आहे. इतर ज्ञातींत तरी प्रवंध आहे; परंतु ब्राह्मणज्ञातींत प्रवंध ह्मणून मुळींच नाहीं. धर्मवेत्ते जे अधिकारी त्यांची यांत किती अपकीर्ति आहे यावद्दल त्यांस यत्किंचितही खेद वाटूं नये काय ? ज्ञातींत जें धर्मविरुद्ध वर्तन होत आहे त्याचे भागीदार अधिकारीही आहेत व ईश्वराजवळ त्यांस याचा जवाव द्यावा लागेल. राजा जसें प्रजेच्या शरीराचें संरक्षण करितो, तसें धर्माचें संरक्षण ज्ञातीचे अधिकाऱ्यानें केलें पाहिजे. राजानें दुर्लक्ष केलें ह्मणजे प्रजेच्या शरीराचें रक्षण होत नाहीं तद्वतच धर्माधिकाऱ्यांचें धर्माकडे दुर्लक्ष झाल्यामुळें धर्माचा नाश होत आहे हें साहजिकच आहे.

अनादिकालापासून धर्मशिक्षण देणारे ब्राह्मणच आहेत. याचें कारण असें आहे कीं, त्या कालीं ब्राह्मण ब्राह्मणत्व जाणून व वाळगून होते. ते आपला धर्म पालन करून देशाचा धर्म संरक्षण करीत असत. सांप्रत ब्राह्मणच ब्राह्मणत्व विसरले; तेव्हां सर्व देशाचा धर्म त्यांचे हातून कसा संरक्षण केला जाईल! जसजसा धर्माचा नाश होत आहे तसतशी विपत्ति वाढत आहे. ब्राह्मण जोंपर्यंत स्वधर्म स्मरत नाहींत. व तदनुसार वर्तन करीत नाहींत, तोंपर्यंत अधर्म वाढून देशास आपत्ति प्राप्त होणार. देशांत अधर्म करण्यास कारण ब्राह्मणच आहेत. करितां अधिकाऱ्यांनीं भेकडपणा सोडून ज्ञातीनें ज्या धर्मासनावर त्यांस वसविलें आहे त्या धर्मासनाच्या वलाचें स्मरण करून यथोक्त व्यवस्था करण्याची तजवीज करावी. ब्राह्मणज्ञातींत धर्म संरक्षण होऊं लागलें ह्मणजे त्यापासून सर्व देशास धर्मवल पोहंचेल व जसजसें धर्मवल जागृत होईल तसतशी देशाची दशा पालटेल. ज्ञातीचे लोक त्यांस जुमानणार नाहींत, ही भीति सोडली पाहिजे. धर्मसंरक्षण करण्याचा निश्चय मात्र त्यांनीं केला पाहिजे. धर्माचा प्रभु जो ईश्वर तो त्यांस यश देईल. सर्व लोकांस स्वधर्मशब्दाचा अर्थ चांगला विंववून दिला ह्मणजे त्यांस समजूं लागेल कीं, ब्रह्मकर्म, वेदाध्ययन वगैरे ब्राह्मणांस अवश्य कां केलीं पाहिजेत. वहुतेक लोक मार्गास लागून मुलांस लहानपणापासून धर्मत्यागाची संवय लागूं देणार नाहींत. स्वधर्माभिमान जागृत होतांच अशा प्रकारें व्यक्तिसुधारणा होऊन कुटुंबसुधारणा होईल. ब्राह्मणज्ञाती सुधारली ह्मणजे इतर लोक त्यांचें अनुकरण करतील. सांप्रत स्वधर्मानें चालणारे असे वाणी मात्र दिसतात. त्यांची स्थिति इतर सर्व ज्ञातीपेक्षां उत्तम आहे. ह्यावरून पूर्ण खातरी होण्यासारखी आहे कीं स्वधर्मात किती श्रेय आहे. या गोष्टीनें तरी ब्राह्मण लोकांनीं आपले धर्माचा अभिमान वाळगावा.

पुरातन इतिहासावरून कळून येतें कीं ज्या ज्या कालीं हिंदुस्थानदेशांत धर्मक्षय झाला त्या त्या कालीं देशांत विपत्ति पडली. धर्मसंरक्षण होतांच सुखाचे दिवस प्राप्त झाले. कारण या देशाच्या सामाजिक स्थितीचें मूळ धर्म आहे. वर्णाश्रमधर्माच्या नाशानें कसे विपरीत परिणाम घडतात. याची साक्ष उत्तर हिंदुस्थानांत पंचगौडांच्या दशेवरून कळेल. पूर्वीं गौड व द्राविड असे दोन भेद ब्राह्मणांचे उत्तर व दक्षिण

भागांत राहिल्यामुळें झाले. गौडांचे पांच भेद उत्तर हिंदुस्थानांत व द्राविडांचे पांच भेद दक्षिण हिंदुस्थानांत. यांत कान्यकुब्ज ब्राह्मण सर्वांत श्रेष्ठ लेखले जात व त्यांचें अनुकरण इतर ९ भेद करीत या पंचगौडांत श्रीहर्षभट्ट, मंडणमिश्र, यांसारिखे मोठमोठे विद्वान् होऊन गेले. मुसलमान लोक ज्यांची पूर्ण भरभराट उत्तर हिंदुस्थानांत विशेष राहिली त्यांच्या भीतिमुळें पंचगौडांनीं वैदिक धर्मकर्में सोडून दिलीं. तीं पुन्हां सुरू झालीं नाहींत. या पंचगौडांचें ब्राह्मणत्व जानव्यापावेतों उरलें आहे. शिपाईगिरी किंवा स्वयंपाकीपणा करून हे आपला चरितार्थ करितात. यांचें वैदिक कर्म सुटलें, परंतु हे सध्यांच्या महाराष्ट्र ब्राह्मणांपेक्षां शुद्धाचरणानें वागतात. महाराष्ट्र ब्राह्मणांच्या हातचें पाणी शेंपन्नास वर्षांनीं कोणी पिणार देखील नाहीं. जेवणाची गोष्ट तर दूरच.

हिंदुस्थानांतील उत्तम नमुन्याची वांधलेली इमारत शोभेल अशी कायम ठेवणें असल्यास तिच्या नियमांस धरून तिची दुरुस्ती केली पाहिजे. इंग्रजी नमुन्याचें चातुर्य तीवर खर्च करून पाहिल्यास तिचें पूर्वरूपही धड राहणार नाहीं व धड नवीनही येणार नाहीं. ही इमारत अशी वेढव करण्यापेक्षां ती पाडून इंग्रजी नमुन्याची अथपासून इतीपर्यंत वांधल्यास चांगलें होईल. हजारों वर्षे खपून जनसमुदायाचे अनुभवानें वांधलेली अदृश्य इमारत सामाजिक स्थिति ही होय. हींत सुधारणा करणें ती तिच्या पूर्वनियमानुसारच केली पाहिजे. नाहींतर तिचें कोणतेंही रूप धड राहणार नाहीं. दुसऱ्या समाजाची एक देखील गोष्ट या अद्भुत समाजस्थितीस हितावह होणार नाहीं. हिंदुस्थानदेशास इंग्लंड जर ह्मणतां येईल तर तेथील सामाजिक स्थिति येथें शोभेल. दोन्ही देशांच्या सामाजिक स्थितींत कवडी मोहरेचें अंतर आहे. इंग्रजी विद्येनें तिकडच्याच आचार विचारादिकांचें ज्ञान झाल्यामुळें ते गोड वाटूं लागले व इकडचें ज्ञान नसल्यामुळें हे कडू झाले. परंतु यांत विद्वत्तेची किती शोभा होत आहे. हा विचार कोणासही नाहीं. चांगलें कोणतें व वाईट कोणतें याचाच जर विचार नाहीं, तर मग विद्वत्तेची घमेंड मात्र मारणें आहे. अज्ञान मुलास कांच व हिरा यांतून उत्तम कोणता पदार्थ आहे हें कळत नसल्यामुळें दुसऱ्याचे ह्मणण्यावर किंवा प्रशंसेवर तो हिरा टाकून कांच घेईल, परंतु हिरा कांचेपेक्षां किमतींत श्रेष्ठ आहे असें समजल्यावर तो कधींही हिऱ्यास सोडणार नाहीं. इंग्रजी विद्येंत निष्णात झाल्यामुळें असा दृढ समज आधुनिक विद्वानांचा झाला आहे कीं, आपलें तितकें सर्व कुच कामाचें. व त्या विद्येस आधारभूत जो समाज व त्यांतील व्यवहार हे चांगले व तदनुसार देशसुधारणा करण्यास जो तो सुपारी उचलीत आहे.

व्यक्तिकुटुंब व समाज यांची जी रचना ती देश ह्मणविते, हें वर सांगितलेंच आहे. या प्रकारची रचना इतर देशांची आहे काय? नाहीं, तेव्हां त्या देशांचे नियमानें या देशाची सुधारणा न होतां देशाचें नुकसान मात्र होतें. अहंपणा अज्ञान मुलांसही असतो. तीं आपला कोणताही पदार्थ सोडूं इच्छित नाहींत. परंतु आधुनिक विद्वान भराभर आपलें सर्व सोडीत आहेत. त्यांस अज्ञ मुलांइतका देखील अहंपणा नाहीं. ज्यांस आपलेपणाचा अभिमान नाहीं त्यांची योग्यता अज्ञान मुलांच्या योग्यतेपेक्षांही कमी आहे. आधुनिक विद्वानांस असें वाटत आहे कीं इंग्रजी शिकलों ह्मणजे देशाची सुधारणा करण्याची योग्यता आपले अंगीं आली. कारण, इंग्रजी विद्येनें स्वतःची सुधारणा पूर्ण होऊन चुकली अशी त्यांची वालंबाल खातरी होऊन जाते. परंतु हें कळत नाहीं कीं आपण आपणास विसरलों. आपलें ब्राह्मणत्व वगैरे कायम ठेवावयाचें असल्यास, नुसत्या इंग्रजी विद्येनें स्वतःची सुधारणा झाल्यानें कायम ठेवूं. ही वेडी समजूत सोडून दिली पाहिजे. या देशाच्या सुधारणेकरितां स्वधर्मशास्त्रानुसार स्वतःची सुधारणा करावी. ही प्रवेशपरीक्षा पास होणें होय. मिडलपरीक्षा पास झाल्यावांचून प्रवेशपरीक्षेचा अभ्यास सुरू करतां येत नाहीं. आणि मिडलपरीक्षेचे विषय पाठ केल्यावांचून ती परीक्षा पास होऊं शकत नाहीं. तद्वतच उपनयन झाल्यावांचून जीं ब्रह्मकर्में ब्राह्मणास आवश्यक आहेत तीं नीट नियमानें व श्रद्धेनें केल्याखेरीज स्वसुधारणारूपी मिडलपरीक्षा पास होऊं शकत नाहीं मग प्रवेशपरीक्षा तर दूरच. या स्वधर्माचरणानें